


# श्री साईलीला

मे

स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. २९६३१



# श्री साई वाक्सुधा

आपल्या अंगीं पूर्ण वैराग्य बाणलें पाहिजे. हितकर काय व अहितकर काय, याचा विचार करण्यांत आला पाहिजे. अविचारानें वागायचें नाहीं हा नित्याचा बाणा असला पाहिजे. अशा पुरुषावर गुरुकृपा होत असते. गुरुकृपा म्हणजेच ईश्वर कृपा. आपली श्रद्धा अढळ असली पाहिजे. प्रत्येक गोष्ट विचारपूर्वक करावयाची. प्रत्येक पाऊल विचारपूर्वक टाकावयाचें. सबुरीची कांस धरावयाची. एवढें झालें म्हणजे आणखी कांहीं करण्याची जरुरी नाहीं. हटयोग नको, प्राणायाम नको, समाधी नको, कांहीं नको. निर्मळ आचार-विचारांची अखंड कांस धरावयाची. त्यांत सर्व कांहीं आलें.

— श्रीसाईसच्चरित


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४२ वें ]　　मे १९६४　　[ अंक २ रा

: संपादक :

श्री. श्रीपाद बाळकृष्ण दर्पे

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ६२२६१

: कार्यालय :

'साई निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०, बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

साईबाबा या जगांत देहरूपानें वावरत होते त्यावेळीं ज्यांना ज्यांना त्यांच्या सानिध्याचा लाभ घडला व ज्यांनीं ज्यांनी त्यांच्यावर निष्ठा ठेविली त्यांचें कोटकल्याण झालें. बाबा हे दुःखितांच्या, संकटग्रस्तांच्या व कोणत्याही प्रकारच्या अडचणींत सांपडलेल्यांचा आधार होते. त्यांच्यापर्यंत जो पोहोचला, त्याच्या पदरी निराशा कधींही पडली नाहीं.

आणि आजकाल ते आमच्या दृष्टीआड देहानें झाले असले तरी ते आपल्या अस्तित्वाची प्रचीति आम्हांला वेळोवेळीं परोपरीनें देत आहेत. गेल्या शेचाळीस वर्षांचा इतिहास हेंच आम्हांला कंठरवानें सांगत आहे. नव्हे टाहो फोडून सांगत आहे कीं, ज्यांनीं ज्यांनीं त्यांच्या शिकवणुकीचें पालन केलें, जगांत कसें वागावें, चालावें व बोलावें याचे जे धडे बाबानीं दिले, त्यांचें आचरण ज्यांच्याकडून घडतें, ज्यांनीं श्रद्धा आणि सबुरी या दोन महान् तत्त्वांची कांस धरली, ज्यांनीं आपलें आचरण पवित्र ठेविलें व जे भक्तिभावानें व श्रद्धायुक्त अंतःकरणानें त्यांना आळवितात त्यांचे हेतू आजही बाबाकडून पुरविले जात आहेत.

" डोळ्यांआड होईन ही चिंता । करूं नका तुम्हीं मजकरितां । माझीं हाडें ऐकाल बोलतां । हितगुज करितां तुम्हासवें ।।

परंतु आपल्याकडून बाबांची कोणती अपेक्षा आहे हेंही आपण समजून घेतलें पाहिजे. प्रत्येक माणसानें आपल्या स्वार्थासाठीं का होईना, कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत त्याग हा केलाच पाहिजे. त्याग हीच तुमची कसोटी आहे. त्याग अनेक प्रकारचा असतो. परंतु जो त्यागाला तयार होतो तोच पुढें मागें सुखाचा व वैभवाचा धनी होऊं शकतो. तुमच्या त्यागाचें फळ मिळाल्याशिवाय केव्हांही रहाणार नाहीं. बाबांनीं अगदी साध्या व स्पष्ट शब्दांत सांगून ठेविलें आहे कीं—"मात्र माझें करा स्मरण । विश्वासयुक्त अंतःकरण । ठेवा करा निष्काम—भजन । कृतकल्याण पावाल ।।

तुमच्या जन्माचें सार्थक व्हावें, तुमचें कोटकल्याण व्हावें व तुम्ही कृतार्थ व्हावें हीच आहे ना तुमची मनकामना ?

मग एवढें कराः बाबांवर संपूर्ण श्रद्धा ठेवा, ती जरा सुद्धां डळमळीत होऊं देऊं नका. तुमची श्रद्धा शंभर टक्के असूं द्या. रतीभरही ती कमी पडूं देऊं नका. भारी कठीण आहे ही एवढीच गोष्ट. ती सोपी नाहीं सकृद्दर्शनी वाटते तेवढी ! मन चौफेर धावाधाव करीत असतें. त्याला जरासुद्धां थारा नाहीं. त्याला लगाम घाला. त्याला सैरावैरा धावपळ करूं देऊं नका. आम्हांला वाटेल तसें वागण्याची, मन मानेल तें करण्याची सवयच पडली आहे.

हा व्यवसाय आमच्या हाडींमासीं खिळून राहिलेला आहे. त्याला खोल वाल्ण्यांत आपण यश मिळविलें पाहिजे. सैरावैरा मोकाटपणें भटकणारीं इंद्रियें आटोक्यांत आणल्याशिवाय व दृष्टि बाबांच्या ठायीं एकचित्त केल्याशिवाय तुमचा संदेश त्यांच्यापर्यंत पोहोंचावा कसा ? ते व तुम्हीं समोरासमोर यायला नको का ? ते आज तुमच्यापासून हजारों मैल दूर आहेत ! तुमचा आवाज, तुमची हांक तेथपर्यंत पोहोंचायला नको का ? ती कशी व केव्हां पोहोंचणार ? हें जें अंतर दोघामध्यें आहे तें तुटलें पाहिजे. तुम्हीं आणि ते जवळ आलां पाहिजे, तुम्हीं एकरूप, एकजीव झालें पाहिजे.


एकरूप होण्याचा मार्ग वेगळा का सांगितला पाहिजे ? बाबांनीं आपल्या वरील शब्दांत तो स्पष्टपणें सांगितला आहे. विश्वासयुक्त अंतःकरण व निष्काम भजन. ह्या दोन गोष्टींची कांस धरायची. त्या तत्त्वांचा अंमल जीवनांत करावयाचा. एवढेंच करा. मग बाबा तुमचेच आहेत.

—संपादक


## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान बनविण्यासाठीं बलवान बनाः**—यासाठीं लागणारी हरेक तऱ्हेची उपकरणें म्हणजे डंबेल्स्, लेझीम, मुगदुल, यासारखा सर्वश्रेष्ठ व उत्तम तऱ्हेचा माल बनविण्यांत येतो.

आम्ही कांदिवली टिचर्स ट्रेनिंग इन्स्टिटयूट, डि. स्कूल बोर्डे, जिल्हा परिषद, नगरपालिका, ग्रामपंचायती, व्यायामशाळा, विकास केंद्रें, याना माल पुरवितो. अधिक माहिती आणि कॅटलॉगसाठीं लिहाः...



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स,** ८५ बापू खोटे स्ट्रीट, जांभळी मोहोल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर — डी. एच्. साखरकर

# भगवंतावर संपूर्ण श्रद्धा

लेखक : एक भगवद्भक्त

जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती ।
चालविसी हातीं धरोनिया ॥
चालों वाटे आम्हीं तुझाचि आधार ।
चालविसी भार सवें माझा ॥
बोलों जातां बरळ करिसी तें नीट ।
नेली लाज धीट केलों देवा ॥
अवघे जन मज झाले लोकपाळ ।
सोइरे सकळ प्राणसखे ॥
तुका म्हणे आतां खेळतों कौतुकें ।
जालें तुझें सुख अंतर्बाह्य ॥

साधुवर्य तुकोबांच्या ह्या अभंगामध्यें किती उत्साह, किती आशापूर्ण वृत्ति व समाधानवृत्ति दिसून येत आहे ! परमेश्वराच्या स्तुतिपर असा हा एक फार सुंदर अभंग आपल्याला लाभला आहे. परमेश्वराचें सानिध्य, परमेश्वराचा सहवास तुकोबांस घडला, आणि त्यानंतर त्यांच्या मनावर जो अत्यंत शुभ परिणाम झाला, तो त्यांनीं ह्या अभंगांत वर्णिला आहे ! अभंग तर दिसावयास अगदीं साधा आहे. ह्या अभंगामध्यें जी शांतीची, जी समाधानाची वृत्ति आपल्याला आढळून येते, ती तुकोबांस नेहमींच लाभत नसे व ती कांहीं त्यांस एकाएकीं प्राप्त झाली, असें म्हणतां यावयाचें नाहीं. त्यांचें धर्मजीवनरूपी आकाश नेहमींच निरभ्र असे, नेहमींच स्वच्छ असे, असें नाहीं. पुष्कळ प्रसंगीं काळींकुट्ट अभ्रें ह्या आकाशांत आलीं आहेत. इतकी कीं, त्यांच्यामुळें त्यांस सर्व प्रदेश अंधारमय भासला आहे व जणूं काय त्यांस गुदमरल्यासारखें झाले आहे ! किती तरी प्रसंगीं त्यांनीं आपली निबिड निराशेची स्थिति व्यक्त केली आहे ; किती तरी अभंगामध्यें त्यांनीं आपली निर्भत्सना केली आहे ; आणि अनेक अभंगांमध्यें आपली दुबळेपणाची, पापसांमुख्याची स्थिति त्यांनीं वर्णिली आहे. आपला भाव दुबळा आहे, आपलें अंतःकरण शुद्ध झालेलें नाहीं, आपण अगदीं पापपंकामध्यें रुतून गेलेलों आहों, खरा पश्चात्ताप कांहीं होत नाहीं, हें मन कांहीं विमल होत नाहीं आणि देवाला कांहीं आपली दया येत नाहीं, व तो कांहीं आपल्याला दर्शन देत नाहीं, अशी संपूर्णपणें निराशेची, निरुत्साहाची स्थिति ज्यांत त्यांनीं वर्णिली आहे, अशेही तुकोबांचे अनेक अभंग आहेत.

## तुकोबाचें धर्मजीवन

परंतु जेव्हां तुकोबांना परमेश्वराचें साक्षात् दर्शन झालें, सर्वत्र परमेश्वराचें त्यांस दर्शन होऊं लागलें, परमेश्वराच्या सर्वत्र दिसणाऱ्या मंगल भावाचा, मंगल योजनेचा मंगल सामर्थ्याचा त्यांना अनुभव आला, तेव्हां पूर्वीची त्यांची निराशा, त्यावेळचे त्यांचे अनुभव त्यांस उपयोगी पडले. ज्यांना आपल्या आध्यात्मिक जीवनभूमीमध्यें दिवसेंदिवस उच्चतर अनुभव यावेत असें वाटत होतें, आणि जें सौंदर्य, जी शोभा, जो अनुभव येथील अनेक सुंदर देखावे पाहूनही येणें नाहीं तो आपणांस यावा, अशी ज्यांची मोठी इच्छा त्या तुकोबांसारख्या भक्तजनांना वरीलप्रमाणें निराशादर्शक प्रसंग अनुभवावे लागले. प्रसंगीं त्यांची पूर्ण निराशा झाली, तरी त्यांत कांहीं आश्चर्य मानावयास नको. अर्थात सतत परमेश्वराचा आपल्याला सहवास घडावा, त्या समागमाच्या आनंदामध्यें आपला काल जावा, अशी ज्यांची मोठी इच्छा असते, त्यांस वरीलप्रमाणें निरनिराळ्या प्रकारचे अनुभव आले,तर कधीं त्यांची वृत्ति क्षुब्ध,कधीं अगदीं निराशेची, कधीं आशापूर्ण अशी झाली तर त्यांत नवल तें कसलें ? हा सर्व त्रास, ह्या यातना, वेदना, प्रसंगीं लोकांकडून होणारा उपहास वरांतील त्रास वगैरे, पुढें होणाऱ्या लाभापुढें कांहींच नाहींत.

अशा प्रकारच्या अनुभवामुळें तुकोबांस अत्यंत उन्नत अशी स्थिति प्राप्त झाली म्हणून तर त्यांच्या ह्या व अन्य अभंगांच्या द्वारे त्यांच्या त्या अनुभवाचा लाभ घडत आहे. तुकोबासारख्या साधूंना जर अशा प्रकारचे अनुभवच आले नसते, त्यांच्या द्वारे त्यांना बोध प्राप्त झाला नसता, व तो अनुभव व बोध आपल्या अभंगांच्या रूपानें त्यांनीं जर मागें ठेविला नसता, तर आज आपणांस त्यांच्या धर्मजीवनाची कल्पनाच झाली नसती. असो.

## देवसेवेला स्वतःस वाहून घेतलें

एकदां महंमद आपल्या कित्येक अनुयायांसह अरबस्थानांतून प्रवास करीत असतां एके रात्रीं भव्य, निरभ्र, अनेक तारकांनीं प्रकाशित झालेलें आकाश अवलोकून, परमेश्वर जणूं काय वर आकाशांत राहत आहे, असें वाटून एक अनुयायी म्हणाला, 'हे अल्ला, ह्या भूतलीं अवतीर्ण हो.' तो शांत व गंभीर प्रसंग अनुभवीत असतां महंमदाच्या मनावरही इष्ट असाच परिणाम झाला होता; परंतु त्याचा अनुभव निराळ्या प्रकारचा असल्यामुळें तो म्हणाला, 'बाबारे, असें काय म्हणतोस ? अल्ला नेहमींच आपल्याबरोबर असत नाहीं काय ?' असाच अनुभव पॉल साधूनें आपल्या एका पत्रांत ग्रथित करून ठेविला आहे. परमेश्वर जर तुला हातीं धरून नेत असला, तर खरोखर तूं बंधमुक्त आहेस. त्याच्या सहवासाचें फळ म्हणजे प्रेम, आनंद, शांति, विनय, चांगुलपणा व विश्वास हें होय, असें त्यानें म्हटलें आहे.

अर्थात् आतां आपल्यापुढें सहज असा प्रश्न येऊन उभा राहतो कीं, तुकाराम,

पॉल, महंमद, वगैरे साधूसंतांना हा अनुभव कसा प्राप्त झाला? याचें उत्तर अगदीं साधें आहे. आपल्याला स्वातंत्र्य मिळावें, सत्ता प्राप्त व्हावी, अधिकार लाभावा, एतदर्थ त्यांनीं कांहीं प्रयत्न केले नाहींत, तर त्यांनीं परमेश्वराची आज्ञा प्रमाण मानणें, हें व्रत पाळिलें. परमेश्वराच्या इच्छेपलीकडे आपली इच्छाच नाहीं अशी त्यांनीं पक्की गांठ बांधिली व आपल्याला सर्व प्रकारे परमेश्वराच्याच चरणीं वहावून घेतलें. कित्येक लोक विशेष प्रसंग व परिस्थिति ह्यांच्या द्वारे त्याचें परमेश्वराच्या दर्शनाची किंवा साक्षात्काराची अपेक्षा करीत असतात. कोणाला विश्वांत दृग्गोचर होणाऱ्या अनेक प्रकारच्या सौंदर्याच्या द्वारें त्याचें दर्शन होत असतें. परंतु परमेश्वराचे खात्रीचे वसतिस्थान असें जर कोठें असेल तर तें मनुष्याचें अंतःकरण होय. ज्या ज्या वेळीं आपल्या हातून जें घडूं नये तें घडतें, आपण बोलू नये तें बोलून जातों, त्या त्या वेळीं आमच्या अंतःकरणामध्ये गूढरूपानें असणारा तो लहान, शांत मंजूळ ध्वनि आमची निर्भत्सना करितो,किंवा आम्ही मार्ग चुकलों असें सांगतो. आमच्या हातून सत्कृत्य घडलें किंवा आम्ही लोभास बळी न पडतां, त्याचेवर जय संपादिला म्हणजे हा मंजुळ ध्वनि आमचे धन्यवाद गातो, आम्हांस उत्तेजन देतो, आम्हांस शाबासकी देतो. ह्या साधुसंतांना परमेश्वराचें दर्शन झालें, देवाच्या सांनिध्याचा लाभ झाला. ह्याचें कारण ते मंजुळ ध्वनीच्या आज्ञेंत राहिले, त्याच्या उपदेशानुसार त्यांनीं वर्तन ठेविलें. त्यांना प्राप्त झालेला आनंद, त्यांची शांति, त्यांचा धर्मानुभव आमचाहा व्हावा असें आम्हांला वाटतें खरें, परंतु दुसऱ्यास आम्हीं दिलेलीं मर्मभेदक उत्तरें, आमची दुष्टोक्ति, इतरांविषयींचे अनुदार विचार, इतरांशीं झालेलें आमचें अन्यायाचें वर्तन, आमचीं मनें त्रस्त करणारी ह्या सर्वांची छाया, किंवा हीं कृत्यें मूर्तिमंत आमच्या पुढें उभीं राहून आम्हांस त्या शांतीचा, त्या सुखाचा लाभ होऊं देत नाहींत; परंतु साधुसंत आमच्यासारखे लेचेपेचे नव्हते. ते मोहास वश झाले नाहींत. त्याजवर त्यांनीं जय मिळविला व म्हणून परमेश्वराच्या पितृवात्सल्याचा त्यांस प्रत्यक्ष अनुभव आला.

**तो मंजूळ ध्वनि**

परंतु आमच्या सारख्यांना सुद्धां आशेस पुष्कळ अवकाश आहे; आम्हीं कांहीं अगदींच निराश, हताश व्हावयास नको. आम्हीं जरी कितीही पापी असलों, आमचीं अंतःकरणें कितीही कठीण अगदीं पाषाणासारखीं झालेलीं असलीं, तरीसुद्धां प्रत्येकाच्या अंतःकरणांत परमेश्वराची दिव्य ज्योति वसत आहे व तिचा प्रकाश, तिचें तेज, आमच्या कधींतरी अनुभवास येतें हें लक्षांत ठेविलें पाहिजे. हा मंजुळ ध्वनि कधीं कधीं आमचें जीवन मधुर करीत असतो, हें तर अनुभवसिद्धच आहे.

आपल्याला **फादर म्याथ्यूची** गोष्ट बहुतकरून माहीत असेलच. मद्यपाना-विरुद्ध हे गृहस्थ मोठी खटपट करीत व अनेक कुटुंबें त्यांनीं मद्यपानामुळें होणाऱ्या भयंकर परिणामापासून वांचविली होतीं. एके दिवशीं एका दारुडाड्याची बायको **फादर म्याथ्यूकडे** आली व त्यांस अत्यंत केविलवाण्या रीतीनें विनवून तिनें सांगितलें

कीं, ' माझा नवरा अतिशय दारूबाज झाला आहे, घरांत सारखी मारहाण चाललेली असतें; मुलें भुकेनें व्याकूळ होऊन त्यांचा प्राण कंठीं आला आहे, तरी ह्याचें व्यसन कांहीं सुटत नाहीं. आपण आमच्या घरीं येऊन त्याला कांहीं दोन गोष्टी सांगा.' **फादर म्याथ्यू** गेले. गांवामध्यें त्यांची चांगली प्रसिद्धि झालेलीच होती. त्यांस आपल्या घरीं येतांना पाहून दारुबाजाची स्वारी चवताळली व त्यांच्यावर शिव्यांची लाखोली सुरू झाली! तीस हे कसली दाद देतात! त्यामुळें दारुबाजाला अतिशय त्वेष आला, व एक पाऊल तर पुढें टाक व आपल्या व्याख्यानाला प्रारंभ कर, म्हणजे एकाचे दोन **फादर म्याथ्यू** करतों कीं नाहीं पहा, अशी धमकावणीहि तो देऊं लागला! हा काय विलक्षण प्रकार असें वाटून मुलें मोठमोठ्यानें रडूं लागलीं व त्यांची दीन आई, ती गाय, हें काय आपण नवीनच संकट **फादर म्याथ्यूवर** आणलें, म्हणून केविलवाण्या दृष्टीनें त्यांच्याकडे पाहूं लागली. पण तिच्या नवऱ्याच्या ह्या दरडावण्याचा **फादरवर** कांहींच परिणाम झालेला दिसला नाहीं. त्यांनीं जवळच जें अगदीं घाणेरडें शेंबडें आणि उघडें पोर होतें त्यास मोठ्या प्रेमानें जवळ उचलून घेऊन अत्यंत प्रेमानें त्याचें चुंबन घेतलें व त्यास खालीं ठेविलें! त्याबरोबर काय चमत्कार झाला पहा! त्या दारूबाजाच्या अंतःकरणांत असलेल्या ज्योतीचा तेथें लख्ख प्रकाश पडला, तो जणूं काय जागृत झाला, व म्हणाला, " काय त्या माझ्या शेंबड्या, घाणेरड्या, भुकेनें व्याकूळ झालेल्या पोराला तुम्हीं जवळ घेऊन त्याचें मोठ्या प्रेमानें, मी जो त्याचें नित्य हाल करीत आहे त्याच्या समोर चुंबन घ्यावें! खरोखर परमेश्वर आहे आणि तो प्रेममय आहे, ह्यांत कांहीं संशय नाहीं. " ह्या माणसाचें व्यसन पुढें सुटलें, हें निराळें सांगावयास नकोच.

### अभंगाचें चिंतन आनंददायक

**तुकोबां**च्या ह्या अभंगामध्यें जें कांहीं माधुर्य आहे, जो कांहीं पवित्रपणा आहे, जें कांहीं सामर्थ्य आहे त्याची फोड मनाप्रमाणें झालेली नाहीं. आपण ह्या अभंगासंबंधानें विचार करूं लागलों म्हणजे मनामध्यें अनेक प्रकारचे विचार येतात. एखाद्या वाटाड्यानें आपणाला उंच पर्वताच्या शिखरावर घेऊन जावें व तेथें गेल्यावर समोंवतालचा रम्य देखावा, पक्षी, नद्या, तळीं सरोवरें ह्यांच्या द्वारें अनेक प्रकारच्या सृष्टिसौंदर्याचें आपल्याला ज्ञान व्हावें, आपलें मन त्या सौंदर्यांत, त्या वैभवांत मग्न होऊन जावें व आपण स्वर्गामध्येंच आहों असें आपणांस वाटावें, तशाच प्रकारचा अत्यंत सुखाचा, आनंदाचा परिणाम ह्या अभंगाच्या चिंतनानेंच मनावर होत असतो. मला फार तर आपल्या स्वतःचा अल्पसा अनुभव—व तोहि अस्पष्ट रीतीनें—आपल्या पुढें ठेवतां येईल. ह्या अभंगामध्यें जें कांहीं सामर्थ्य आहे, जें कांहीं सौंदर्य आहे, तें सर्व आपल्याला स्पष्ट करून दाखवण्याचें सामर्थ्य मजमध्यें नाहीं. एके दिवशीं पहाटेस मी माझ्या बिछान्यावर पडून असतां आकाशांतील एक तेजःपुंज

# श्री निसर्गदत्त महाराजांचीं बोधवचनें

आहार, निद्रा, मैथुन त्यांतून जीव जगत ब्रह्माचा अनुभव येतो. भक्तिमार्ग कधींहि नष्ट होणार नाहीं. भक्ती कशी करावी ?— भक्तीनेंच भक्ती करावी, ज्ञानानेंच ज्ञानाची भक्ती केली पाहिजे. ज्या ज्ञानामुळें ज्या चिद्संविदमुळें हें जाणवतें त्या जाणवत्या ज्ञानानेंच ज्ञानाची भक्ती केली पाहिजे आपल्या कल्पनेंतूनच हें जग निर्माण झालें आहे. ज्या चिद्संविदमुळें आपणाला हा अनुभव येतो ती संविद्च आपण आहे. त्या चिद्संविदचाच धर्म, तिचें रुप कोणतें तें जाणलें पाहिजे. जें जें दृश्य दिसें तें तें सर्व नासे, तें तें न असें कारण तें मुळांतच नाहीं. आज जें मोठे बंगले, राजवाडे दिसतात तीं पूर्वीं होती का ? तर नाहीं. दृश्य म्हटलें कीं द्रष्टा आलाच परंतु परमात्मा हा दृश्यावेगळा, तो अविनाशी, निराकार असा आहे. त्या दृश्यावेगळा आपण कोण कसा काय आहे ह्याचें रूप प्रत्यक्ष पाहिलें पाहिजे. परमात्मा ही एक व्यक्ति आहे असे जीव मानतो.

ज्या अज्ञानामुळें हा अनुभव येत आहे तें ज्ञानच आपण आहे, परंतु ज्ञाना-अगोदर जी वस्तू आहे तिलाच परमात्मा ही संज्ञा आहे. ज्या जाणिवेनें जाणतो तिलाच ज्ञान अशी संज्ञा आहे.

ज्ञानालाच ईश्वर ही उपमा आली आहे, ज्ञानाचें साक्षित्व करणारी जात तिलाच परमात्मा अशी संज्ञा आहे.

"ईश्वर ह्या शब्दा ( पलिकडे ) शिवाय तुम्हांला त्याचे कोणतें रूप दिसतें."

---

तारा प्रकाशिलेला पाहून हा अभंग मी म्हटला. तो मी जसजसा पुन्हां म्हणूं लागलों तसतसा माझ्या मनावर त्याचा अधिकाधिक शुभ परिणाम होऊं लागला. तो इतका कीं, त्या दिवसाची, त्या परिणामाची व त्या सुखमय अनुभवाची मला अद्याप चांगली आठवण आहे व ती स्मृतीही चित्तास आल्हाददायक व उत्तेजक अशी वाटते. आपल्याला देखील ह्या अभंगाच्या सामर्थ्याचा अनुभव यावा असें वाटत असेल, तर आपणही प्रातःकालच्या समयीं, ज्यावेळीं झोंप पुरीं झालेली असेल, पक्षाचें मधुर गायन सुरू झालें असून ज्यावेळीं आपल्या निद्रेंतून ही सृष्टिदेवताहि जागृत होत असते अशा वेळीं तो म्हणा, वारंवार गा, त्याच्याविषयी शांतपणें विचार करा, त्याच्या अर्थाकडे लक्ष द्या, म्हणजे त्या अभंगांतील मधुर भाव आपल्या अंतःकरणांस गोचर होईल, त्याचें माधुर्य आपल्या लक्षांत येईल व हा अभंगामध्यें किती आध्यात्मिक बोध आहे, याची साक्ष आपलें अंतःकरणच आपल्याला देईल.

आपण आतां ज्ञानी झालो असें तुम्हांला वाटत असेल तर तो तुमचा भ्रम आहे. तुम्ही ज्ञानी असालही परंतु तुमच्या अंतर्यामींचा वांच्छा धर्म जोपर्यंत नाहींसा झाला नाहीं तोपर्यंत तुम्ही खरे ज्ञानी नव्हेत, तर तें तुमचें फक्त शब्दज्ञान आहे.

० ० ० ०

बुद्धि चालवून ज्ञानाच्या गप्पा माराल तर त्यानें तुम्हांला कधींच शांति व सुख लाभणार नाहीं, कारण त्या सत्स्वरूपापुढें बुद्धि टिकतच नाहीं.

० ० ० ०

मी तेजोमय आहे, मी आतां आकाशासारखा आहे, मी निराकार आहे, मी निर्मळ आहे, शरिरविरहीत आहे अशी घोषणा ( ध्यास ) निदान झोंपतांना तरी अनिर्वाच्यणें चालूं द्या; मग संवय संवयीनें तशी दशा तुम्हांस प्राप्त होईल. हें गुरूवचन विसरूं नका; कारण झोंपतांना तुम्हीं जें स्मरण कराल तेंच तुमच्या अंगीं भरेल.

० ० ० ०

स्वरूपज्ञान झालेले ( ज्ञानी ) जर एका बाजूला जाऊन बसले तर जगाचा व्यवहार कसा चालेल ?

० ० ०

" ईश्वर " शब्दाशिवाय दुसरे कांहीं नाहीं. परंतु कांहीं नाहीं असें म्हटल्यानें तुमचा निश्चय बिघडूं देऊं नका.

जरी स्वरूपज्ञान तुम्हांला झालें तरीपण आत्मध्यान, भजनपूजन सोडूं नका. कारण भक्तिशिवाय ज्ञानाला लज्जत नाहीं. स्वरूप तत्त्वज्ञ जें कांहीं बोलतात, प्रतिपादितात तें स्वप्नावस्थेंत बोलतात, स्वप्नावस्थेंत म्हणजे त्यांना नकळतच, व म्हणून त्यांना कोणाची, कसलीही बिशाद नसते. स्वतःबद्दल स्वतःचीच त्यांना बिशाद नसते. स्वरूपज्ञानी जें जें कांहीं बोलला तें तें स्वप्नावस्थेंत म्हणजे त्याला स्वतःला नकळत म्हणून त्या बोलण्याचा त्याला अभिमान नसतो. राम असो कृष्ण असो कोणी कां असेना, कितीही तत्वज्ञ जरी असला तरी तो पदार्थजन्य आहे. हे स्वरूपज्ञानी पाहतो.

० ० ०

ज्ञात्याला देह सोडतांना जर देव भेटे तर सर्व करणें वायां गेले.

० ० ०

तुमच्या उदरांत गुरु आला आहे त्याचे यथायोग्य पालन करा.

० ० ० ०

जें कांहीं ऐकलेत त्याचे ध्यान करा. तुम्हांला जें ज्ञान आहे त्या ज्ञानाचे ध्यान

करा. तें जर आठवत नसेल तर स्वस्थ तरी राहा. तुम्हांला तुम्ही असल्याचे जाणवतें तेंच देवाला देव असल्याचे जाणवतें. आतां देवाला देव असल्याचे जाणवण्याला आधार तो ( भक्त ) असल्याचे जाणवते. ज्या जाणीवेमुळें तुम्हांला हा अनुभव येतो ती जाणीवकळा नसेल तर हा देव हें म्हणणारा कोण ? तुम्ही असल्याची तुम्हांला जाणीवकळा ती देवाला देव असल्याची देवकळा, म्हणून तुम्हांला जें कांहीं पाहिजे ते देवाला पाहिजे असा तुमचा निश्चय होऊं द्या.

तुमच्या मनाला तुम्ही कह्यांत ठेवा, तुमच्या मनाला गुरुपदीं स्थिर करा व तुम्ही मनाचे मालक व्हा.

आपण असल्याची जाणीव कळा हीच ती अमूर्त परमात्म स्वरूपाची ठेव. त्या जाणीवेला जी योग्यता तुम्ही द्याल ती योग्यता तुमच्या अंगात भरेल, पण देहाच्या नव्हे. तुम्ही जेव्हां ध्यान करतां तेव्हां तें गुरूस्वरूप तुमच्या अंगांत भरते. तुम्ही मूर्त स्वरूपाचें ध्यान करतां करतां तें मूर्तस्वरूप तुमच्या मूळच्या अमूर्त स्वरूपांतूनच प्रकाशमान होतें. यालांच भगवान स्वरूप म्हणतात. पुल्लिंग ऊल्लेखानें भगवान स्वरूप तर स्त्रीलिंगी उल्लेखानें भगवती स्वरूप. तुम्हांला ज्याचें दर्शन होतें मग तें दत्ताचे, विष्णूचे, आणखी कोणाचे कां असेना तें तुमच्या अमूर्त स्वरूपांतूनच होतें.

° ° ° °

देह सोडतांना पुण्यवानाला विष्णूचे दूत व व पाप्याला यमदूत न्यावयास येतात या सव भ्रामक गोष्टी आहेत. जर जगांत येतेवेळीं आपल्या बरोबर सोबत कोणीही आले नाहीं किंवा आल्याचे स्मरतही नाहीं मग देह सोडतांना कोणी येईल ही ऐकीव कहाणी आहे.

जी योग्यता तुम्ही तुमच्या निजात्म्याला द्याल त्या योग्यतेनें तो प्रगट होईल. तुमच्या निजात्म्याची हाच तो सद्गुरु म्हणून पूजा करा मग त्याप्रमाणें तुमची योग्यता वाढेल परंतु तुमची म्हणजे देहाची नव्हे.

आत्मज्ञानाविना अन्य कोणी देव वा गुरू असा अनुभव गुरूभक्ताचा असत नाहीं.

विश्वासाचे काम आहे. " विश्वासो फलदायकः " विश्वास ही महान चीज आहे. आपण असल्याचा विश्वास हेंच तें सद्गुरूचरण. असा निश्चय झाला कीं अन्य कोणी देवदेवतांच्या गांठी भेटीची जरूर नाहीं.



# श्रीसंत गाडगेबाबा

## कांहीं आठवणी

**श्रीसन्त गाडगेबाबा यांस कोणता महाराष्ट्रीय ओळखत नाहीं ? 'भूतदया हेंचि भांडवल सन्तां'—असें म्हटलें आहे. सन्त गाडगे बाबा म्हणजे भूतदयेचा हिमालय होता. सुप्रसिद्ध लेखक श्री. गो. नी. दांडेकर यांस त्यांचा सहवास कांहीं वर्षे लाभला होता. त्यांनीं सुंदर भाषेंत त्यांच्या जीवनकार्याची ओळख 'देवकीनन्दन गोपाला।' या छोटया पुस्तकांत करून दिली आहे. त्यांतील कांहीं आठवणी पुढें देण्यात येत आहेत.**

श्री गाडगे बाबांचं कीर्तन म्हटलं कीं अपार गर्दी. तें कुठंतरी मल्या मोठ्या मैदानांत किंवा शेताडींत व्हायचं. बाबांच्याच तालमींत तयार झालेले साधक. ते सगळं पटांगण स्वच्छ करून ठेवीत. मधोमध दोन उंच खांब. त्यांना एक आडवा वासा बांधलेला. पताकातोरणांनीं सगळं मैदान सजवलेलं.

संध्याकाळीं त्या आडव्या वास्याला दहावीस पेट्रोमॅक्स लटकत. त्या बत्यांखालीं रात्रीं बाबा उभे राहात. अडीच तीन वाजेपर्यंत कीर्तनाची गंगा वहात असे. कीर्तन तरी कसले ! तो एक गुरुशिष्यांचा संवादच चाले. बाबांनीं प्रश्न विचारावा. समूहानं उत्तर द्यावं.

### गाडगे महाराजांचा विनोद

बाबांचा विनोद गदगदा हंसवणारा असे. सगळ्यांना समजेल असा. बाबा एखादा करुण कथा सांगत, त्या वेळीं समाज रडूं लागे. बाबा चिडून बोलत, तेव्हां समाजाला असा भास होई, कीं कोणी आपल्या पाठीवर कोरडेच ओढतोय्.

रात्रभर भजनाचा गजर चाले.

देवकीनंदन गोपाळा ।<br>
ज्ञानदेव तुकाराम ।<br>
राधेकृष्ण गोपाळकृष्ण ।

कीर्तन संपल्यावर बाबा कुठं तरी तास दोन तास विश्रान्ति घेत. कुण्या शेतांत. कुण्या विहिरीच्या कांठावर. कुण्या झाडाखालीं. एखाद्या पेटवलेल्या खोडाच्या शेजारीं.

अन् मग पहाट झाली, कीं बाबांचीं खराटापलटण झाडायला निघे. पुढें हातीं खराटा घेतलेले बाबा. मागें साधकांचा समूह. मुखीं नामाचा गजर.

पहातां पहातां पटांगण स्वच्छ होई. तोंवर खिरीच्या काहिली शिजत. भाताचे डेरे खदखदा उकळत. कढीच्या कढया तयार होत.

मग बाबा हांक मारीत,

" चला हो ! दोऱ्या येऊं द्या. चुन्याचे डबे– "

दोऱ्या अन् चुन्याचे डबे येत. पटांगणांचा अंदाज घेऊन बाबा पंगतीसाठ ओळी आखीत. दोऱ्या धरून दोन माणसं धांवत. काठीनं जागा मोजून बाब ओरडत,

" हां ! चला. चालूं द्या लैना !

## जेवणावळीचा थाट

मग एक जण चुन्याचा डबा धरून धांवे. एक जण त्यांतला मूठमूठ चुना घेऊ दोरीच्या रेषेंत जमिनीवर रेघा काढीत चाले. दहा दहा हजार माणसं जेवायची अस या सगळ्यांसाठीं रांगोळ्या काढतां काढतां कमरेचा कांटा ढिला होऊन जाई.

थोडंसही इकडे तिकडे केलें, तर पाठींत बाबांनी काठी वाजण्याचा संभव अरे शिवाय वर पुष्पांजली.

" इतक्यांतच थकले ? मग घरीच रहाते ! साधूपना काय फुकटचा आहे का ?

ओळी आखून झाल्या, कीं मग स्वयंपाकाचा अंदाज घेऊन बाबा हांकारीत,

" चला, मानसं बसूं द्या ! "

अन् मग माणसं ओळींवर बसवतां बसवतां जीव अगदीं नकोसा होई. माण कुठंही बसत. बाबांच्या काठीकडे लक्ष ठेवून त्यांना नीट ओळींच्या माझं बसवावं ला वाटेल तिथं नाहीं. एक रांग भरल्यावर मग दुसरी.

मग पत्रावळी मांडणं त्याही एका रेषेंत असल्या पाहिजेत. थोडी मागं पुढं झा कीं बाबा ओरडत,

" कोन्या बैलानं ती पत्रावळ मांडली ? "

मग अन्नाचं वाढप. त्याबरोबरच भजनाचा घोष.

देवकीनंदन गोपाला !

पुंडलिक वरदा होऊन पंक्ती बसल्या, कीं मग कुठं बाबा कुण्या झाडाखालीं ज्यानं सता केला, त्यानं सगळ्यांची जेवणं झाल्यावर मग यायचं. तोंपर्यंत नाहीं.

मग शेवटीं बाबा म्हणत,

" हां, आतां आमच्यासाठीं भाकर येऊं देआ. "

अन्न आलं, कीं, बाबांनीं हातावर भाकर घ्यावी. खापरांत वरण. भाकरीवर भा

तात्पर्य, जेवायला तीन तीन चार चारही वाजायचे. जीव अगदीं आंबून जायचा. थकव्यानं अगदीं नको नको व्हायचं.

अन् या वेळीं उग्र रूप टाकून बाबा सौम्य व्हायचे. जवळ घेऊन पाठ थोपटीत म्हणायचे,

"वा! छान झाला जी सत्ता!"

मग सगळा शीणभार हरायचा.

**अपंगांची दया**

बाबांचं अपंगांवर फार लक्ष. आंधळे, पांगळे, महारोगी, थोटे, महारोगी या सर्वांविषयीं बाबांच्या मनीं अपार करुणा.

"धडक्यांचीच तर पोटं भरतां भरतां मारामार. मग या बिचाऱ्यांना कोण विचारतो! कुणी नाहीं. लोक बामणांना दानं देतात. सहस्रभोजनं घालतात. सहस्रभोजनं म्हणजे भरल्या पोटावर शिऱ्यावर लेप करणं आहे बुवा!"

"कुणी साधुसंतांच्या पायीं नोटांच्या चळती अर्पण करतात. काय त्याचा उपयोग! तें तर वाळूंत पाण्याची घागरी उलटी करणं आहे!"

मग बाबा या अपंगांसाठीं दातांच्या कण्या करीत. स्वतःसाठीं पै न मागणारा हा म्हातारा या लोकांसाठीं तोंड वेंगडायला कमी करीत नसे.

ते म्हणत,

"तुमच्या अंगावर सोन्यामोत्याच्या राशी आहेत. काय त्यांचा उपयोग! गरिबासाठीं कांहीं द्याल, तर तुमच्या सरदारीचं मोल!"

मोती पहने घोडा चढे रण बांधे तरवार।
गरीबकी कदर जाने वाको नाम सरदार॥

दर आषाढीकार्तिकीला पंढरपुरला अपार यात्रा जमते. नाशिकची यात्रा तर वर्षभर सुरूच. बहुधा या सर्व यात्रांच्या ठिकाणीं बाबांनीं राजवाड्यांसारख्या धर्मशाळा बांधल्या. त्यांच्यांतून वर्षभर अंधपंगूसाठीं सदावर्त सुरू असत.

कुण्याही धड माणसाला त्या सदावर्तांत तुकडा कांहीं मिळायचा नाहीं. बाबा असले, कीं स्वतः त्या पंगतींतून हिंडायचे. कोणी धडका शिरला, तर त्याला कांठीचा तडाखा देऊन हांकून काढायचे.

साधकांना सदावर्तांच्या पंगतींत खपावं लागायचं. या अंधळ्यापांगळ्यांना धरून आणायचं. नीट पंगतींत बसवायचं. भजन सुरू करायचं. त्यांचं जेवण झाल्यावर त्यांना हात धरून ठिकाणावर पोंचवायचं.

बहुधा हे सगळे अपंग भिकारी असायचे. त्यांची भूक सदा जागी. वासना

नेहमीं अतृप्त. पंगतींत वाढलेलं अन्न ते भांड्यांतून लपवायचे. बाहेर नेऊन विकायचे. तेव्हां याही बाबतींत दक्ष रहावं लागे.

**महारोग्यांची सेवा**

विशेषतः महारोग्यांच्या बाबतींत बाबांचं मन फार द्रवायचं. ते म्हणत,

"यांना कोणी जवळ करीत नाहीं. सगळे यांचा तिटकारा करतात. यांच्यापासून दूर पळतात. मग यांनीं कुठं जावं ?"

महारोगी भयानक दिसत. अतिशय ओंगळ असत. हातापायांना व्रण पडलेले. त्या व्रणांवर माशा घोंगावत असलेल्या. भीक मिळावी, म्हणून ते आपलं दुःख अधिकच किळसवाणं करीत.

पण बाबांना स्वतः महारोग्यांची शुश्रूषा करतांना पाहिलं, म्हणजे मनांतली त्यांच्याविषयींचा किळस दूर होत असे. असं वाटे, कीं एवढा प्रचंड कीर्तिचा हा म्हातारा जर महारोग्यांचं एवढं करतो, तर मग आपणही करावं.

मग आपणही त्या महारोग्यांजवळ जावं. त्यांच्या जखमा धुवाव्यात. त्यांना स्नान घालावं. त्यांचे कपडे धुवावेत. त्यांना जेवूं घालावं.

हें सगळं पाहून बाबा अतिशय स्नेहानं जवळ घेत, म्हणत,

"बाबू रे ! अशी सेवा करनं, हेच तर देवाची पूजा होय !"

या रोग्यासाठीं बाबा जेव्हां कुणा एकाजवळ कांहीं मागत, तेव्हांची गंमत फार पहाण्यासारखी असे.

अगोदर बाबा त्याच्या घरची चौकशी करीत. घरीं उद्योग काय चालतो तें विचारीत. बाबांच्या जवळ खोटं बोलायचं साहस कुणाला करवत नसे.

मग बाबा हळूंच म्हणत,

"का जी ! इतले तुम्हाले भेटते. आमच्या आंधळ्यापांगळ्यांसाठीं ना देसान् कांहीं !"

**आंधळ्यापांगळ्यासाठीं द्या**

त्या माणसाला विचार करण्याची संधीच न लाभूं देतां बाबा दुसरा घाव घालीत,

"पहा बोवा ! आमच्यासाठी आम्हीं मांगतो काय कांहीं ? नाहीं.आम्हाले काय लागते ? एक भाकर. लोटाभर पानी. ते तर कोनीही आईबाई देते. तर या गरिबाहिसाठीं मांगून राहिलों बुवा !

गरीब के लिये मंगो दिलमें रखो न लाज ।।

जितक्यांनीं कांहीं कांहीं देलं, त्या अवघ्यांचीं नांव बोडावर लिहिलीं आहेत. पाहेबा बरं ! तुमचंहि नांव झळकूं द्या ना त्यांत !"

तो माणूस अजून नीटसा तयार झाला नाहीं, असं पहातांच बाबा विरक्तपणे म्हणत,

" आमाले काय ! कोठीसाही याहिच्याशाठीं भीकच मांगनं आहे. तुम्ही ना म्हनशान् त पुढल्या घरीं जाऊं. पन विचार करजा- हे पैशे तुमच्या संगे येतीन् काय ? "

तो माणूस म्हणे,

" नाहीं; "

" कोनाहि धनी मानसाबरोबर कोनीं नोटा जाळल्या काय ? "

" नाहीं. "

" कोनालाही माती आड करताना त्याच्याबरोबर हिरेमोती पुरले काय कोनीं ? "

"नाहीं. "

" बरं घराला आग लागून तें जळलं तर काय कराल ? "

" कांहीं नाही. "

## घर चोरांनीं लुटलं तर

" चोरांनीं लुटलं तर काय कराल ? "

" कांहीं नाहीं. "

" सरकारांत दंड झाला, तर भराल का नाही ? "

" भरू. "

" असंच असतं मानसाचं ! "

अगिन पलीता राजदंड ।
चोर लूट लइ जाय ॥
तीनों दण्ड दुनिया सहाय ।
पर धरमदण्ड ना सहाय ॥

मग तो माणूस ताळ्यावर येऊन म्हणे,

" बाबा, देतों शंभर रुपये.

" बस ? एका गरीब बाईनं त पांचशे देले ! तितलेही ना देशान् ? "

असं फुलवून फुलवून, चौबाजूंनीं घेरून बाबा पैसे काढीत. आम्ही आपापसांत चेष्टेनं म्हणत असं,

" भिकाऱ्यांनीं जर आपलं राज्य स्थापन केलं, तर बाबा त्या राज्याचे सम्राट् शोभतील ! "

## पंचवीस लाखांचा हिशोब

सबंध आयुष्यांत बाबांनीं किती पैसे मिळवले ?

नक्की सांगतां येत नाहीं. पण पंचवीस लाखांच्या आसपास.

कोणालाही न ठरवतां, कुणाच्याही हक्कांत बाधा न आणतां बाबांनीं एवढं मिळवलं अन् मग या सर्व पैशांचं काय केलं ?

बाबांच्या इतका दक्ष आणि सावध माणूस क्वचितच सांपडेल. ते एका पै न् पैचा हिशेब ठेवीत. व्यर्थ खर्च त्यांना खपत नसे. साधाकांकडून एखाद्या कृपण सावकाराप्रमाणं ते कवडीकवडीचा झाडा घेत.

त्यांच्या गळ्यांत एक बारकी उभट पिशवी असे. तींत एक वही. अंदाजें शंभर पृष्ठांची. ती वही ते सदैव बरोबर बाळगीत असत.

तींत काय काय असे.

ब्रह्मांड. दात्यांची नांवं. पत्ते. चुन्याचा भाव. सीमेंटच्या पोत्यांचा हिशेब. मिळा-लेली रक्कम. झालेला खर्च. धर्मशाळांच्या दारांची मापं. फोडलेल्या दगडांच्या बराशींचीं मापं, ऑईलपेंटचे भाव. गोरक्षणांत गाई आणल्या, त्यांची नांवं, कीर्तनाच्या तारखा. कुणा साधकाच्या तोंडून ऐकलेला एखादा चांगला अभंग. अंधूपंगूसाठीं घेतलेल्या पितळी कटोऱ्यांचा हिशेब. आंधळ्या बायांसाठीं लुगडीं विणणाऱ्या विणकारांचे पत्ते—

स्वतः बाबांना एकही अक्षर लिहितां येत नसे. पण कोण्या चांगलं अक्षर असलेल्या साधकाकडून ते हें सगळं लिहवून घेत. त्यांना बारीक व सुवाच्य अक्षर आवडे. मला दोन तीन वर्षं हें काम करण्याचं भाग्य लाभलं होतं.

दर दोन तीन महिन्यांनीं ते वही बदलीत. अन् मग कुठं तरी ठिय्या देऊन जुन्या वहींतला आवश्यक तो सर्व मजकूर ते नव्या वहींत लिहवून घेत.

### स्वतःसाठीं कांहीं नाहीं

या जवळ जवळ पंचवीस लक्षांपैकीं एक पैसुद्धां बाबांनीं स्वतःच्या प्रपंच विस्ताराकडे लावला नाहीं. पंढरपूर, नाशिक, देहू, आळंदी, महाबळेश्वर, पुणें मुंबई आदि महाराष्ट्रांतील प्रमुख क्षेत्रीं अन् शहरीं त्यांनीं धर्मशाळा बांधल्या–बांधवल्या. नद्यांना घाट. गोरक्षणं. पाणपोया. अंधूपंगूंसाठीं सदावर्तं. मुलांसाठीं शाळा. कॉलेजं. वसतिगृह—

जिथं जिथं आवश्यकता निर्माण होई, तिथं तिथं बाबा आपल्या साधकांच्या फौजेसह उपस्थित होत असत. महाराष्ट्रांत दुष्काळ पडला. बाबा धांवले. नद्यांना पूर येऊन गांवं वाहून गेलीं. बाबांच्या मदतीचा हात पोंहचला. कुठं जळितं झालीं. बाबांनीं त्या पीडीतांसाठीं होईल तितकं केलं.

पंढरपुरीं कॉलरा होत असे. बाबा पूर्वाष्यांत स्वतः त्या आजाऱ्यांच्या उशापाशीं जागले. अनेक यात्रिक बाबांच्या मांडीवर डोकीं ठेवून मेले. निर्भय मनानं, सावधपणं यत्किंचित्‌ही न डगमगतां बाबा दीपस्तंभासारखे आयुष्यभर उभे होते.

श्री साईबाबा—

# त्या काळांतील कांहीं संस्मरणीय आठवणी

**बाबांचे भक्त**

परमेश्वराची प्राप्ति करून घेण्याचे अनंत मार्ग आहेत. पण सर्वांत अगदीं सोपा आणि सहजसुलभ मार्ग कोणता असेल तर तो गुरुकृपा. योग्य सद्गुरूची भेट होण्यास देखील पूर्वजन्मींची पुण्याई लागते. भक्ताच्या मनांत भक्तीची तीव्र आंच उत्पन्न झाली म्हणजे त्याला योग्य मार्गदर्शन करणारा साईसारखा सद्‌गुरू योगायोगानें आपोआप भेटतो. श्रीसाईंच्या भोंवतीं भक्तगण असेच केवळ दैवगतीनेंच जमूं लागले. त्यांपैकीं कांहीं जणांवर प्रथमपासूनच बाबांचें प्रेम जडलें. अशा भाग्यवान लोकांत तात्या कोते पाटील आणि म्हाळसापती यांचा प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल. या दोघांचा बाबांना इतका लळा लागला होता कीं, रोज रात्रीं झोंपतांना ते बाबांच्या सोबतीला असत. द्वारकामाईत पूर्व, पश्चिम आणि उत्तर दिशेला डोकें करून हें त्रिकूट रोज रात्रीं झोंपे व मध्यभागीं तिघांचे पाय एकमेकांना स्पर्श करीत. मध्यरात्रीपर्यंत त्यांच्या गप्पागोष्टी चालत. एखाद्याला झोंप येऊं लागली, तर दुसरा त्याला मुद्दाम जागं आणण्याचा प्रयत्न करी. स्वतः बाबांना झोंप फार कमी होती. त्यामुळें ते दुसऱ्यांनाही झोंपूं देत नसत. तात्याला गदगदां हालवून आणि डोकें आपटून बाबा जागें करीत; तर म्हाळसापतीला याय ओढून जवळ खेंचीत आणि पाठीवर प्रेमानें थोपटून झोंप मोडण्यास भाग पाडीत. या त्रयीचा हा झोंपेचा विचित्र क्रम सतत चौदा वर्षें चालू होता. तात्या आणि म्हाळसापती यांनीं आपल्या संसारावर आणि घरादारावर बाबांच्या प्रेमासाठीं तुलसीपत्र ठेविलें होतें. तात्यांचे वडील वारल्यावर सर्व जबाबदारी अंगावर पडल्यामुळें मोठ्या नाइलाजानें शेवटीं त्यांना घरीं जाणें भाग पडलें. म्हाळसापती मात्र शेवटपर्यंत बाबांच्या बरोबर होते.

राहत्याच्या चंद्रभानशेट मारवाड्यावरही बाबांचें असेंच फार प्रेम होतें. या शेटजींच्या मृत्यूनंतर खुशालचंद नांवाच्या शेटजींच्या पुतण्याला बाबांचा लोभ संपादन करण्याची संधि मिळाली. बाबा कितीही रागावले तरी खुशालचंदाची आठवण काढीत आणि त्याची योग्य ती काळजी घेत. खुशालचंदहि बाबांची योग्य ती संभावना राखी. एकदां बाबा राहत्याला गेले असतां सर्व लोकांनीं त्यांची वाजत गाजत मिरवणूक काढली व मोठ्या समारंभानें शेटजींच्या वाड्यांत नेऊन तेथें त्यांची पूजा केली.

शिरडी हें राहतें आणि निमगांव यांच्या बरोबर मध्यावर आहे. बाबा आपल्या उभ्या आयुष्यांत या गांवांच्या पलीकडे कधींहि गेले नाहींत. त्यांनीं कोणत्याहि

वाहनांतून कधीं प्रवास केला नाहीं. आगगाडी तर बिलकूल पाहिली नाहीं. इतकें असून कोपरगांवला येणाऱ्या जाणाऱ्या सर्व गाड्यांचें वेळापत्रक ते अगदी अचूक सांगत. या बाबतींत पुष्कळ भक्तांना फार विलक्षण अनुभव आला आहे. कित्येकदां तर बाबांच्या हुकुमाप्रमाणें आगगाड्या सुटत, असें म्हणणें भाग पडे.

**बाबा भिक्षा कां मागत ?**

श्रीसाई हे प्रतिपरमेश्वर होते, तर मग सामान्य माणसाप्रमाणें भिक्षा मागून ते आपला उदरनिर्वाह कां करीत ? असा प्रश्न आपल्या मनांत येणें अगदीं शक्य आहे. आपल्या हिंदुशास्त्राप्रमाणें ज्या व्यक्तींनीं संसाराचा त्याग करून संन्यासधर्म स्वीकारला आहे. ज्यांच्या सर्व इच्छा तृप्त झाल्या आहेत, ज्यांनीं घरदार सोडून वानप्रस्थाश्रमाचा अवलंब केला आहे, अशा विभूतींना 'भिक्षांदेहि' करण्याचा पूर्ण अधिकार आहे. साईबाबा हे विरक्त संन्यासी होते आणि म्हणूनच हजारों भक्त त्यांच्या सेवेला तत्पर असतांना, शेवटपर्यंत त्यांनीं भिक्षेचा मार्ग पत्करला. अशा थोर विभूतीला भिक्षा घालण्यांत पुण्यसंचय होतो. गृहस्थधर्मांतील तो एक आचार आहे आणि पवित्र कर्तव्यही आहे.

आपलें अन्न तयार होत असतांना आपल्या हातून पांच क्रिया होत असतात. कांडणी, पेषणी, उदकुंभी, मार्जनी आणि चुल्ली. या पांच क्रियांचे संस्कार अन्नावर होतात आणि त्यांत सहजच असंख्य प्राण्यांचा सूक्ष्म जीवजंतूंचा संहार होतो. अर्थातच तें शिजविलेलें अन्न दूषित होऊन त्याचा आपल्या शरीरावर आणि मनावर अयोग्य परिणाम होतो. श्रीसाईसारख्या परमोच्च कोटीला पोहोंचलेल्या विभूति आपल्या शरीराच्या आणि मनाच्या शुद्धीकरणासाठीं अशा अन्नाचा त्याग करितात आणि भिक्षेचा मार्ग पतकरतात. कारण भिक्षान्नाला कोणताहि दोष नाहीं.

**तर्खड यांचे अनुभव**

बाबांना भिक्षा घालण्याविषयीं किंवा पूजेनंतर नैवेद्य प्रसाद देण्याविषयीं भक्तांनीं कोणताहि विकल्प मनांत आणूं नये. कारण बाबा भिक्षा किंवा नैवेद्य ग्रहण करण्याच्या पूर्ण योग्यतेचे सत्पुरुष होते. रोजच्या पूजेचा नैवेद्य देण्यास भक्त जरी विसरला, तरी बाबा त्याला आठवण करून देत आणि हक्कानें प्रसाद मागून घेत, याविषयींचें बाबासाहेब तर्खडांचें प्रत्यक्ष घडलेलें उदाहरण ऐकून कोणाहि भक्ताचें पूर्ण समाधान होईल. रामचंद्र आत्माराम तर्खड हे वांद्रें येथें रहात होते, आणि ते प्रार्थनासमाजिस्ट होते. त्यांच्या मुलाची व पत्नीची बाबांवर पूर्ण श्रद्धा होती. रोज नित्यनियमानें बाबांची पूजा करून नैवेद्य दाखविल्याशिवाय तीं अन्नग्रहण करीत नसत. एकदां त्यांचे चिरंजीव आपल्या आईला घेऊन शिरडीला गेले. जातांना घरची साईंची पूजा करण्याची कामगिरी बाबासाहेबांनीं पतकरली. त्यांना या गोष्टीची संवय

नव्हती, तरी मुलाचा भाव लक्षांत घेऊन ते रोज पूजा करीत. एक दिवस कचेरीच्या गडबडींत ते घरांत नैवेद्य तयार नसल्यामुळें नुसतीच पूजा उरकून कामावर निघून गेले; तरी देखील आपल्या हातून झालेल्या आगळिकीचें सविस्तर पत्र त्यांनीं शिरडीला आपल्या मुलाला लिहिलें.

नेमके त्याच दिवशीं शिरडीला तर्खडांचे चिरंजीव आपल्या मातुश्रीसह स्नान आटोपून बाबांची पूजा करण्यास आले असतां बाबा त्यांच्याकडे मंद स्मित करीत म्हणाले, " आई, मी वांद्याला मोठ्या आशेनें कांहीं खाण्यास मिळेल म्हणून गेलों, परंतु घर बंद होतें. मी तसाच आंत गेलों. पण भाऊंनीं आज माझी निराशा केली. मला प्रसाद कांहींच मिळाला नाहीं. तसाच परत आलों. "

सौ. तर्खडांच्या डोक्यांत बाबांच्या बोलण्याचा कांहींच प्रकाश पडला नाहीं. पण मुलाच्या लक्षांत खरा प्रकाश ताबडतोब आला. आपल्या वडिलांच्या हातून, आज कांहींतरी चूक झाली असेल असें वाटून त्यांनीं बाबांची क्षमा मागितली. बाबांनींही उदार अंतःकरणानें क्षमा करून त्यांच्याकडून यथाविधि पूजा तेथेंच करून घेतली. मुलानें आपल्या वडिलांना ही हकीकत पत्रानें कळविली आणि दोन दिवसांनीं बाबासाहेबांचेंही पत्र येऊन थडकलें. या प्रसंगाला योगायोग म्हणून म्हणण्याचें धारिष्ट कोणीहि करणार नाहीं. बाबा अंतर्ज्ञानी आणि उच्चकोटीला पोहोंचलेले सद्गुरु होते हेंच खरें.

## प्रेमाचे भुकेले बाबा

शबरीनें चाखलेलीं उष्टी बोरें प्रभु रामचंद्रांनीं प्रेमानें ग्रहण केलीं. भक्तांचा भाव ध्यानीं आणून श्रीसाई, प्रसाद म्हणून पाठविलेली अगदीं लहान वस्तु देखील अत्यंत प्रेमानें मागून घेत. तर्खडांच्या पत्नीनें एकदां पुरंदरेबाईबरोबर दोन वांगीं पाठवून दिलीं; आणि एकाचें भरीत व दुसऱ्या वांग्याच्या काचऱ्या करून बाबांना देण्याची विनंती केली. पुरंदरेबाई शिरडीला गेल्यानंतर वांग्याचें भरीत करून बाबा जेवणास बसले असतां घेऊन गेल्या. बाबांनीं तें भरीत प्रेमानें मागून घेतलें आणि वांग्याच्या काचऱ्या कोठें आहेत म्हणून विचारलें. राधामाईंना प्रश्न पडला. वांग्यांचा मोसम नसल्यामुळें बाजारांत वांगीं मिळणें शक्य नव्हतें. शेवटीं पुरंदरेबाईजवळ त्या चौकशी करण्यास गेल्या, तेव्हां आपण काचऱ्या करण्याचा आळस केला. हें त्यांनीं कबूल केलें आणि तर्खडमाईंनीं दिलेल्या दुसऱ्या वांग्याच्या काचऱ्या तळून बाबांना पाठवून दिल्या. दुसऱ्या एका प्रसंगीं गोविंदजी नांवाचा एक मुलगा शिरडीस जाण्यास निघाला असतां तर्खडमाईंनीं घाईघाईनें बाबांना नैवेद्य दाखविलेला एक पेढा उचलून त्याच्याजवळ दिला व तो बाबांना आठवणीनें देण्याची त्याला विनंति केली. शिरडीस बाबांच्या दर्शनास गेल्यानंतर तो मुलगा विसरला आणि स्तब्ध बसून राहिला. बाबांनीं बराच

वेळ वाट पाहिली आणि ती कांहींच देत नाहीं. असें पाहून त्याला स्पष्ट विचारलें, "काय रे, माईनें मला देण्याकरितां खाऊ दिला तो कोठें आहे?"

## चतकोर भाकरीनें पोट भरलें

गोविंदजीनें ताबडतोब बिऱ्हाडी जाऊन तर्खडमाईंनीं दिलेला पेढा बाबांना आणून दिला. बाबांनीं अत्यंत प्रेमानें तो शिळा पेढा एकाच घासांत ग्रहण केला. देव प्रेमाचा भुकेला आहे. साईंनीं क्षुल्लक पेढा मुद्दाम मागून घेऊन आपलें भक्तांवरील प्रेम दर्शविलें. तर्खडमाईंना बाबांनीं असे अनेक दृष्टांत देऊन सदुपदेश केला आहे. शिरडीला त्या रहात असतांना ऐन जेवणाच्या वेळीं एक भुकेलेला कुत्रा जवळ आला आणि मोठमोठ्यानें ओरडूं लागला. माईंनीं पानावरून उठून त्याला एक चतकोर भाकरी खाण्यास दिली. दुपारीं बाबांच्या दर्शनास गेल्यानंतर बाबा सुहास्यवदनानें म्हणाले, "आई, ऐन भुकेच्यावेळीं तुझ्या भाकरीच्या तुकड्यानें माझें मनसोक्त पोट भरलें. माझा अंतरात्मा खुष झाला. नेहमीं असेंच वागत जा. प्रथम आंधळ्या–पांगळ्या, भुकेनें व्याकूळ झालेल्या माणसाला अन्न दिल्याशिवाय स्वतः भोजन करूं नकोस. माझ्या शब्दावर विश्वास ठेवून अशीच वागशील, तर निश्चित सद्गति पावशील."

बाबांचे हे उद्गार ऐकून माई बुचकळ्यांत पडली. तिनें धीर करून बाबांना म्हटलें, "बाबा, मी तुम्हांला आज सकाळीं नैवेद्य म्हणून कांहींच दिलें नाहीं!"

"आणि मग सकाळीं जेवतांना कुत्र्याला भाकरी दिलीस ती! मीच कुत्र्याच्या रूपानें तेथें आलों होतों. प्रत्येक प्राणिमात्राच्या ठिकाणीं परमेश्वरी अंश आहे, हें तत्त्व लक्षांत बाळगून प्राणिमात्राच्या ठिकाणीं भूतदया दाखविण्याचा नेहमीं प्रयत्न कर." बाबांचें हें उत्तर ऐकून माई थक्क झाल्या. माईप्रमाणें इतर भक्तांनाही बाबांनीं असाच उपदेश वेळीवेळीं केला आहे. बाबा स्वतःकडे कोणताही मोठेपणा न घेतां अत्यंत लीनपणें नेहमीं म्हणत, "मी गुलामांचाही गुलाम, तुम्हां सर्वांचा अत्यंत ऋणी आहें. तुम्ही माझ्याकडे आलांत म्हणजे तुमच्यापेक्षां कितीतरी अधिकपटीनें मला समाधान होतें. तुम्ही श्रीमंत, पदवीधर, विद्वान, चांगल्या उच्च ब्राह्मण कुळांत जन्मलेले खरे पुण्यवान प्राणी आहांत. तुमच्या मानानें मी एक सामान्य भिकारी, सूक्ष्म जिवाणु आहे. माझ्या दर्शनाला येऊन तुम्हीच माझ्यावर अनंत उपकार करीत आहांत. त्या उपकारांची परतफेड करण्याचें सामर्थ्य माझ्यांत नाहीं." हे साईंचे उद्गार केवळ स्वतःकडे हीनपणा घेण्याकरितांच आहेत. साईंच्या पासंगालाहि बसण्याची योग्यता कोणाला येणें शक्य नाहीं.

सामान्य माणसाप्रमाणें बाबांचे सर्व व्यवहार चालू असत; परंतु कोणत्याही गोष्टीची वासना त्यांना नव्हती. भक्तांनीं आणलेली वस्तु ते आनंदानें खात, पण

कोणत्याही वस्तूची चव त्यांना कळत नसे. डोळे उघडे ठेवून ते सुंदर वस्तूकडे न्याहाळून पहात आहेत असें दिसे, पण त्या क्षणीं त्यांची अंतर्दृष्टी दुसऱ्याच एकाद्या अज्ञात स्थळीं एकाग्र झालेली असे. मनोविकार, क्रोध, प्रेम आणि अनुराग या सर्वांना योगबलानें आपल्या आधीन ठेवून ते बजरंगाप्रमाणें स्थितप्रज्ञ अवस्थेंत नेहमीं असत. इतके भयंकर रागीट स्वभावाचे बाबा पण प्रसंगी गोगलगायीप्रमाणें इतके नम्र आणि मृदु बनत कीं, पाहणाऱ्याला हेंच ते बाबा काय असा प्रश्न पडे.

## नानावल्ली म्हणजे खरोखर एक वल्ली

नानावल्ली नांवाचा एक चमत्कारिक व लहरी स्वभावाचा माणूस बाबांची सेवा-चाकरी करावयास शिरडीला राहिला होता. नानावल्लीने वेडाच्या लहरींत बाबांना एकदां आपल्या आसनावरून उठण्याचा हुकूम केला बाबा निमूटपणें उठले व आपल्या पवित्र आसनावर त्याला बसण्याची पूर्ण मुभा दिली. नानावल्लीची लहर ओसरतांच तो स्वतःच उठला आणि बाबांच्या चरणांवर डोकें ठेवून त्यांना शरण गेला. इतकें राग येण्यासारखें अपमानकारक कृत्य सर्वांसमक्ष प्रत्यक्ष बाबांच्या पवित्र द्वारकामाईत त्यानें केलें असतां बाबा एका शब्दानेंही रागावले नाहींत. या नानावल्लीनें बाबांना फार त्रास दिला. एखाद्या खाष्ट बायकोप्रमाणें छळलें. पण बाबांनीं त्याचा सर्व छळ सहन केला आणि आपल्या अंगीं सहनशीलता किती बाणली आहे हें दाखवून दिलें. उलटपक्षीं नानावल्लीचें देखील बाबांवर अगदीं निरपेक्ष प्रेम होतें. बाबांच्या समाधिकालानंतर बरोबर तेराव्या दिवशीं नानावल्लीनें आपली जीवनयात्रा संपविली आणि बाबांच्या मागोमाग निघून गेला.

बाबांच्या रोजच्या दिनक्रमांत अगदीं साध्या गोष्टींतही फार प्रगल्भ अशी बुद्धिमत्ता आणि कौशल्य दिसून येई. त्यांची प्रत्येक कृति भक्तांच्या हिताकरितां होत असे. अज्ञानी माणसांना तिचा अर्थ कळत नसे. शींवचे नानासाहेब पिटकर यांनीं आपला एक लहानसा स्वानुभव सांगितला आहे. ते आपल्या मित्राबरोबर शिरडीला साईच्या दर्शनास गेलें असतांना बाबा भयंकर संतापले व त्यांना परत जाण्यास सांगूं लागले. आपल्या हातांतील काठीनें मारण्याचा आवेश दाखवून बाबा, "चले जाव, अभी के अभी जाव." अशी गर्जना करीत होते. नानासाहेबांना प्रथम बाबांच्या कृतीचा अर्थच कळला नाहीं. मनाचा हिय्या करून चिकाटीनें ते बसून राहिले. पुढें दीक्षितांकडून त्यांनीं बाबांच्या कृतीचा अर्थ समजावून घेतला. त्या सुमारास गांवांत प्लेगची सांथ आली होती आणि प्रत्यक्ष शिरडीला लागण तेव्हां होण्याची भीति होती. तेव्हां परगांवाहून अजाणपणें आलेल्या कोणाही भक्ताला त्या भयंकर सांथीचा त्रास होऊं नये, या सदिच्छेनें बाबा प्रत्येकाला तेथून हांकलून लावण्याचा प्रयत्न करीत होते.

—

# रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग

"रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग ।
अंतर्बाह्य जग आणि मन ॥"

संत तुकाराम महाराजांच्या अभंगांतील हा एक चरण आहे. महाराज म्हणतात, मला रात्रंदिवस लढावें लागत असतें. कोणाशीं ? जग आणि मन या जोडीशी. तुम्हीं म्हणाल, अहो संत कधी लढलेत कां ? ते तोफा बंदूकानीं लढले नसतील; त्यानीं माणसें मारली नसतील; पण त्यानांही तुमच्या प्रमाणेंच लढावें लागले आहे. तुम्ही ज्यासाठीं लढत आहांत, त्यासाठींच संतही झगडले आहेत. तुम्ही कां लढत आहांत ? जग आणि मन यासाठीं.

जग म्हणजे चांगल्या वाईट स्वभावाचीं माणसें, अथवा चांगल्या वाईट माणसांच्या सत्तेखाली असल्यामुळें चांगले वाईट बनलेले देश. चांगली माणसे व चांगले देश सर्वांचे कल्याण करतात. निदान वाईट तरी करत नाहींत. त्यांच्याशी कुणालाच लढावें लागत नाहीं. पण दुष्टांचें तसे नाहीं. त्यांना दुसऱ्यांचें नुकसान करावे, गोरगरीबानां लुटावे आणि आपली घरे भरून चंगळ करावी असें वाटतें. दुष्ट देशही यासाठींच लढाईला उठतात. असल्या दुष्टाशीं सहजच लढण्याचा प्रसंग येतो; तुम्हाला असल्या दुष्टामुळेंच आज हिमालयाच्या थंडीवाऱ्यांत लढावे लागते आहे. तुम्ही कोणासाठीं लढत आहांत ? चांगल्या जगासाठीं वाईट जगाशीं म्हणजे दुष्टाशीं तुम्ही लढत आहांत. संतही चांगल्यासाठीं वाईटाशीं झगडले आहेत, म्हणून ते म्हणतात—

**आम्ही राऊत रामाचे । हातीं भाले हरिनामाचे ॥ १ ॥**
**घोडा काढूं चढूं खुरीं । जळें घेऊं यमपुरी ॥ २ ॥**

संत किंवा सैनिक शास्त्र आणि शस्त्रें घेऊन लढतात कारण त्यांच्या मनानें केलेला लोककल्याणाचा निश्चय होय. हा कल्याण करण्याचा निश्चय म्हणजेच मन. संतांना आणि सैनिकांना आपल्या मनाशींहि झगडावें लागलें कां ? एक मन सांगतें— "बाबा रे ! कां इतके कष्ट सोसतोस ? आपल्या घरदार मुलाबाळांचा विचार कर !" दुसरे म्हणते; "अरे ! ते तर आपल्या घरीं आहेतच. आज आपण त्यांच्यांत गुंतून घरीं बसलो; तर शत्रूला थोपवणार कोण ! आणि शत्रू मातला तर आजचे थोडेबहुत सुख सुद्धां मग त्यांना मिळेल कां ?"

आपलें घर बरे कां समरांगण बरे ! अशी मनाची रस्सीखेंच म्हणजेच मनाचें युद्ध. संत आणि सैनिक या मनांत चाललेल्या युद्धांत कां सांपडतात ! संत म्हणतात—

**बुडतां हे जन न देखवे डोळां । येतो कळवळा म्हणोनियां ॥**

सहज वाटेनें जातां जातां एखादा मनुष्य चक्कर येऊन पडला, मूल धांवतां धावतां अडखळून पडतें, असले लहानमोठे अपघात आपण पाहिले, तर तावडतोब कसलाच विचार न करतां आपण तिकडे धांवत जातो, अवश्य ती मदत करतो. कां ! आपणच आपणांस तिकडे खेचून नेतो. समरांगणावर आपल्या प्राणाची तमा न बाळगतां आपल्या साथीदारानां व पिछाडी पलीकडच्या गोरगरीब जनतेला जपण्यासाठीं सैनिकांची जी धांवपळ चालते, त्यासाठीं सैनिक जे वेगवेगळें डावपेंच करतो, ते कोणामुळें ? या आत्म्यामुळें. आत्म्याला हें दुःख पहावत नाहीं. आणि म्हणून तो तुम्हांस असें दुसऱ्याच्या सहाय्यासाठीं खेचत असतो, देवच तुम्हांस लढवतो.

तुम्ही कोणासाठीं लढतां आहांत ? युद्धामुळें ज्यांना आपले घरदार सोडावें लागले–उपासमार सहन करावी–अनेक प्रकारची दुःखें सहन करावी लागली, अशा आपल्या देशबांधवासाठीं त्यांच्या आत्म्याला जें दुःख होतें आहे, ते दुःख कमी करण्यासाठीं तुम्ही शस्त्र हातीं घेतले आहे. आत्मा म्हणजे काय ? देव आत्म्याचें दुःख शास्त्रांनी दूर करतांत, सैनिक शस्त्रानीं दूर करतो. या कारणामुळें संतांचें कीर्तन प्रवचन जशें देवांची पूजा होते, तसेंच सैनिकानें टिपलेला एकएक दुष्ट ही। देवतेचीच पूजा होते, एक एक दुष्ट मरत गेला तर जनतेचे म्हणजे आत्म्याचेंच एक एक दुःख कमी कमी होत जाते, संतांच्या उपदेशानें जसें एक एक दुष्ट मन बदलत जाते, वाईटाचें चांगलें होते, तसतशी जनता सुखी होते, तसाच तुमच्या हातून वाईटांचा नाश चालला आहे. फरक असेल तर एवढाच संत वाईटाचें मन पालटतांत, तुम्हाला दुष्ट मनें मारावी लागतांत. हा फरक कां ? नासलेला आंबा हा अढींतून काढून तुडवूनच टाकावा लागतो म्हणून संत म्हणतात—

**विंचू देव्हाऱ्यावरि आला । देवपूजा नावडे त्याला ॥**
**तेथें पैजारेचें काम । अधमाहून तो तो अधम ॥**

पूजा करतानां देवाच्या मूर्तीशेजारी विंचु आहे. तो देवाशेजारी आहे म्हणून देवाबरोबर त्यालाही गंधाचें बोट लावावें म्हटलें, तर तो म्हणेल कां ! "अरे हा माझी पूजा करतो आहे, आपण याच्या बोटाला डंख मारूं नये !' तें शक्य नाहीं. तुमचें बोट गंधाचें असूं दे अथवा हळद कुंकवाचें असूं दे. ते जवळ आल्यावर तो आपलें दुष्ट कार्य करणारच. आणि म्हणून तो जरी शेजारच्या देवाची पूजा बऱ्या बोलानें करूं देत नसेल, तर उठावें, खेटर घ्यावें, आणि विंचू ठेचावा, हरच पुढची

पूजा पार पडेल. सारांश दुष्टपण बऱ्या बोलानें बदलण्यासारखें नसेल तेथें ते उखडण्यासाठीं दुष्टाचा नाशच आवश्यक आहे, आणि म्हणून तुम्हाला ही वाईट मतें म्हणजे शत्रू मारावा लागतो आहे. वाईटाचा नाश हीच देवाची सेवा.

सारांश, सैनिकांची शत्रूंचा नाश करणारी लढाई ही देवपूजा आहे. ही पूजा आमचे भारतीय जवान आज करीत आहेत. त्यांनीं आपल्या सेवेचें हें महत्त्व ध्यानीं राखून एवढाच एक नेम करावा म्हणजे देव त्यांना पाठिराखा होईल—यशस्वी करील.

सैनिकांनीं सकाळीं उठल्या बरोबर ईश्वराचें स्मरण करून म्हणावें, “ देवा ! शंकरा ! मला हात पाय दिलेस. बळ दिलेंस, तुझ्या पूजेसाठीं मला या तुझ्या हिमालयांत आणलेस. पूजा करविणारा तूंच आहेस. तूं आज माझ्या हातून जेवढे शत्रू मारवशील, तेवढी शिरकमळें तुला वाहिल्याचें पुण्य मला मिळणार आहे. मला तुझी सेवा करावयाची आहे. ती सेवा अशीच रोजच्या रोज माझ्या हातुन शत्रूचा नायनाट होईतों अखंड घे. माझ्या हातुन सुटणाऱ्या प्रत्येक गोळीनें तुला एक एक शिरकमळ अर्पण होवो. ”

गीतेमध्यें भगवान श्रीकृष्णानीं अर्जुनाला अशाच प्रकारें पण असें सांगितलें आहे. आणि हा क्षत्रियधर्मच जयश्री खेचुन आणतो. म्हणून श्रीकृष्ण म्हणतांत. “ माम् अनुस्मर युद्धच ”


# लहान मुलांच्या आंकडीवर

## जुनें आणि प्रसिद्ध औषध

### जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# कोणत्याही कामाचीं तीन अंगें

**—सन्त विनोबा**

कोणतेंहि काम नीट व्हावयाचें म्हटल्यास त्याला तीन गोष्टींची जरूर असते. पहिली गोष्ट म्हणजे त्या कामांतला संपूर्ण वेग साधला पाहिजे. परीक्षेसाठीं प्रश्न विचारले जातात. त्यांची उत्तरें ठरलेल्या वेळेच्या आंत लिहून झालीं पाहिजेत असा नियम असतो. ह्यांत महत्त्वाचा मुद्दा आहे. अमुक मैल कूच करून जावयाचें आहे, एवढाच प्रश्न लष्करापुढें नसतो. पण अमुक वेळेच्या आंत अमुक मैल जावयाचें आहे असा मुदतबंदीचा प्रश्न लष्करापुढें असतो. जी गोष्ट लष्कराची तीच कमजास्त प्रमाणांत व्यवहारांतल्या सर्व उद्योगाला लागू आहे. रसोई करणारा मनुष्य रसोई चांगली करतो पण पांच माणसांची रसोई बनविण्याला त्याला पांच तास लागतात, तर त्याचें रसोई बनवणें निरुपयोगी आहे. काळाच्या प्रवाहांत मनुष्य सांपडलेला असल्यामुळें त्याला सर्व कामें ह्या प्रवाहाचें धोरण सांभाळून करावयचीं असतात. म्हणून वेग साधणें हा कामांतला एक आवश्यक मुद्दा ठरतो.

दुसरा मुद्दा कामांतील सफाई किंवा नेटकेपणा, लष्कराचाच दाखला घेतला तर अमुक मैल अमुक वेळांत कूच करून जावयाचें हें तर झालेंच पण हें कूच करण्याचें काम पद्धतशीर, लष्करी शिस्तीबरहुकूम, टीप सांभाळून झालें पाहिजे. पांचापांचांच्या कीं चाराचारांच्या जशा ठरल्या असतील तशा रांगा करून चाललें पाहिजे. सर्वांची पावलें सारखीं पडलीं पाहिजेत. कोणी मागेंपुढें होतां कामा नये. असें होईल तरच त्या कूच करण्याचा उपयोग व्हावयाचा. कामांतली सुंदरता साधली नाहीं तर काम करून न करून सारखें होतें. पेंढार आणि लष्कर ह्यांतलें अंतर हिंदुस्थानचा इतिहास पाहिल्यानें समजतें. सुंदरता किंवा नेटकेपणा हा गुण कामांत आल्यानें दुधांत साखर टाकल्याप्रमाणें काम खुलतें आणि हा गुण नसलेलें काम म्हणजे नुसतें दूध, असें नव्हे. सुंदरता हा गुण नसलेलें हें कामच नव्हे. त्याची तुलना दुधामध्यें स्वभावतःच असलेली साखर ज्यांतून काढून घेण्यांत आली आहे असल्या बेचव दुधाशीं करावयाची. म्हणजे सुंदरता हें कामाचें गंध नसून तें कामाचें कपाळ आहे. ज्या कामांत नेटकेपणा नाहीं तें काम फुटक्या कपाळाचें आहे. सुंदरता ही कामाची केवळ शोभा नसून तो कामाचा गाभा आहे. **"त्याचें गळां माळ असो नसो"** अशांतला हा ऐच्छिक गुण नाहीं. पण आवश्यक गुण आहे.

कामांत वेग पाहिजे, नेटकेपणा पाहिजे आणि तिसरी गोष्ट ज्ञान पाहिजे. ज्ञानविहीन कर्मानें मुक्ति नाहीं म्हणतात तें अक्षरशः खरें आहे. लष्करानें ठरलेल्या वेगानें अगदीं पद्धतशीर कूच केलें आणि तें ठरलेल्या वेळीं पोंचलें सुद्धां, पण ठरलेल्या जागीं मात्र पोंचलें नाहीं. जाणून काम केलें नाहीं म्हणजे अशी दशा होते. बरोबर नकाशे आंखून रस्त्यांतलीं वळणें कोठ कोठें कसकशी सांपडावयाचीं हें ठरवून त्याप्रमाणें कूच केलें पाहिजे. हा मुद्दा इतका उघड आहे कीं त्याचा खुलासा करण्याची जरूर नसावी.

कोणत्याहि कामाचीं हीं तीन आवश्यक अंगें आहेत. **काम जाणून केलें पाहिजे, नेटकें केलें पाहिजे, वेगानें केलें पाहिजे.** हे तिन्ही गुण साधले म्हणजे काम साधलें. उदाहरणार्थ, लिहिणें केव्हां आलें म्हणावयाचें ? जलद धावत्या हातानें लिहितां आलें पाहिजे. "**वाटोळे सरळ मोकळें**" असें सुंदर लिहितां आलें पाहिजे. आणि शुद्धलेखनाच्या नियमाबरहुकूम शुद्ध लिहितां आलें पाहिजे. इतकें झालें म्हणजे लिहिणें आलें. शीघ्र लेखन हें लेखनांतलें 'कर्म,' सुंदर लेखन ही 'भक्ति' आणि शुद्ध लेखन हें 'ज्ञान' असेंहि गीतेच्या भाषेनें म्हणतां येईल. ह्या तिहींचा 'योग' साधणें हीच काम करण्याची हातोटी किंवा खुबी. "**योगः कर्मसु कौशलम् ।**"

आणि ह्याचेंच नांव 'सच्चिदानंदा'चें स्मरण. कारण कामांतला वेग म्हणजेच 'सत्'. जे टिकणारें तें 'सत्'. काळाशीं टक्कर मारील तेंच टिकेल. बाकीचें टिकणार नाहीं. म्हणून ज्या कामांत वेग नाहीं तें 'असत्'. जाणून काम करणें ह्याला 'चित्' म्हणावयाचें. कारण कामांतलें ज्ञान गेलें म्हणजेच चेतनाच गेली. आणि नेटकेपणा हा कामांतला 'आनंद' हें काय सांगायला पाहिजे ?

———

॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

# महिला वस्तु भांडार

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें

लोंकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधनांचे व्यापारी.

**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

*** आमची कोठेंही शाखा नाहीं. ***

# रामनामाची जादू

रामनाम किती मधुर आहे. या जगांत त्याच्याइतकें मधुर दुसरें कांहीं नसेल. तें अमृताहून आगळें आहे. त्याची गोडी अवीट व अजोड आहे. तो महामंत्र आहे. त्या महामंत्रानें अनेकांच्या जीवनांत अलौकिक क्रांती घडवून आणिली आहे. महापापी लोकांना त्या मंत्रानें साधू बनविलें आहे. वाल्मिकी मुनी पूर्वी कोण होते! दरोडेखोर व दरोडेखोरांचे प्रमुख! रामनामानें त्यांच्या सर्व पापांचें क्षालन होऊन ते महर्षीपदाला पोहोंचले. कोट्यावधि हिंदु लोकांच्या मुखीं नेहमीं रामनाम असतें. जीवनशुद्धि करणारा त्याच्यासारखा मंत्र नाहीं. रामनामाचा प्रसार एकेकाळीं जगांतील अनेक देशांतून झालेला होता. आजही त्याचे अवशेष निरनिराळ्या देशांत उपलब्ध होतात. मेक्सिको, सयाम, जावा वगैरे देशांत आजही रामनामाचें महात्म्य फार आहे.

रामनामाच्या माधुरीनें संत त्यागराज वेडा झालेला होता. रात्रंदिवस त्याला राम नामाशिवाय दुसरें कांहीं सुचत नसे. रामस्तवनपर अशीं दहा हजार कवनें त्यानें रचिलीं आहेत. आणि तीं लोकप्रिय होऊन राहिलीं आहेत. रामनाम घेण्याचा व त्याच्याशीं एकजीव होण्याचा सुलभ मार्ग आहे. दर सेकंदास आपण श्वासोच्छ्वास घेत असतों. दिवसांतून किती वेळां माहीत आहे. एकवीस हजार वेळां! ती क्रिया कशी अगदीं सहजरीतीनें वेळच्यावेळीं व आम्हांला न समजतां सतत चालू असते. तेंच तर आपलें जीवन आहे. जिवंतपणाचें तेंच तर लक्षण! त्या प्रत्येक श्वासाबरोबर आम्हीं रामनाम कां घेऊं नये. तोंड न उघडतां आवाज न करतां अगदीं मनांतल्या मनांत!

आमच्या शरिराच्या अणुरेणूंत रामनाम व्यापलें गेलें पाहिजे. आनंदाच्या प्रसंगीं दुःखाच्यावेळीं, वेळींअवेळीं सतत रामनाम आमच्या मुखांत खेळत राहिलें पाहिजे, मग पहा त्यामुळें काय चमत्कार घडून येतो तें!

आमचें शरीर म्हणजे मंदिर आहे. त्या मंदिरांत रामाची स्थापना भगवंतानेंच करून ठेविली आहे. आम्हांला त्याची जाणीव मात्र नाहीं. ती जाणीव रामनामाच्या सतत जपानें आपणास होईल.

# संत नगाजी महाराज

लेखक : ना. श्यं. जवारकर, धुळें

नागपूर प्रांती हिंगणघाट नजीक पारडी गांवी, पोतरा, वन्ना नद्यांचे संगमावर विठोबा नापिक ( न्हावी ) राहात होता. तो शस्त्र कलेंत निष्णांत होता. तो भावीक, त्यांची पत्नी रखमा शांत स्वभावाची पतिव्रता होती. दोघांचे ज्ञानेश्वर हे दैवत होतें. त्यांचें फोटोची ते दोघे नित्य पूजा करीत. विठोबा मूळचा मेहेकरचा; पण दुष्काळ पडून विपत्ति दशा आल्यामुळें पारडी येथें राहण्यास आला होता. पारडीच्या नजीक गांवाबाहेर एका वारूळांत मोठा नाग असे. त्याचें डोक्यास खांडूक झाले होतें, त्यामुळें तो फार तळमळत असे. एके दिवशीं विठोबाचे स्वप्नांत येऊन त्यानें खांडूक कापून मला दुःख मुक्त कर असें सुचविलें. नागानें सांगितलें, " मी तुझ्याकडे यावें पण मला जाणारे येणारे लोक धोंडे काठ्या, पहारी घेऊन मला मारून टाकतील म्हणून तुला विनंती करीत आहे. विठोबा सकाळीं वेरूळाजवळ गेला व नागोजी बुवा बाहेर या, मी विठोबा शस्त्र घेऊन आलों आहे. नागोजीबुवा बाहेर आले. त्याचे डोक्यावरील खांडूक विठोबानें कापलें. नागोबाला आराम वाटला, तो म्हणाला, " तुला एक भगवद्भक्त पुत्र होईल. त्याचें नांव नगाजी ठेव. " इतकें बोलून नाग वारुळांत परत गेला. शके १६७६ कार्तिक शु॥ ५ ला पुत्र जन्माला आला. विठोबानें त्याचें नांव नगाजी ठेवलें. तो मोठा झाला तसा तो नाचूं खेळून भजन करी. ज्ञाने-श्वराचाच अवतार विठोबा समजे. कित्येक वर्षें नगाजी पंढरपूर आळंदीस जात असे. चातुर्मास्य तेथें राहून पारडीस जाई. तो मोठा अधिकारी भगवद्भक्त. ज्ञानेश्वरांनीं प्रत्यक्ष प्रगट होऊन डोक्यावर वरदहस्त ठेवला व सांगितलें कीं यापुढें तूं पंढरपूर आळंदीस येत जाऊं नको. मीच पारडीस कार्तिक वद्यांत पांडुरंगास घेऊन येत जाईल. तेव्हांपासून पारडीस मोठा उत्सव सुरू झाला. शेजेगांवचा विद्वान् ब्राह्मण रामभट दुर्गे कीर्तनास येत. नंतर त्यांचा मुलगा सात दिवस कीर्तनास जाई. त्याचा मुलगा राम-भटाचा नातू माधव मंदबुद्धीचा तोतरा होता. त्यांस विद्या येईना. वडिलांस वाईट वाटे, माधवास त्याचे वडिलांनीं सारखें शिकवावें पण त्याचा माधवास तेव्हांच विसर पडे. तो शेवटीं कंटाळून पारडीस नगाजीमहाराजा-कडे गेला. त्यांनीं त्यास जवळ ठेऊन घेतले. एक वर्ष पुरे होतांच नगाजीमहाराजांनीं त्यास कीर्तनास उभे केले, त्यानें उत्तम कीर्तन केलें. सर्वांस आश्चर्य वाटलें. माधवाचे वडील कीर्तनास हजर होते. त्यांनीं नगाजीचे पाय धरले. श्री ज्ञानेश्वरांनीं रेड्या मुखें वेद वदविले. आपण एका वेड्या मुखें कीर्तन करविलें. खरोखर आपण प्रत्यक्ष ज्ञानेश्वर पुन्हां अवतरले यांत शंका नाहीं असें म्हटलें.

नगाजी धोपटी घेऊन दर बुधवारीं रामाजी पाटलाची हजामत करण्यास जात असे. सेना न्हाव्याच्याच चरित्राप्रमाणें विठोबानें नगाजीचें रूप घेऊन रामाजीची

हजामत केली. वऱ्हाडांतील एदलाबाद गांवीं पृथ्वीपुरी गोसावी रहात होता. हटयोगी म्हणून त्याची प्रसिद्धि होती; पण मनाची तळमळ राहिना. ते नगाजोकडे गेले. भक्तीनेंच देवदर्शन होईल. नगाजीनें सांगितलें, भजनानें दांत एके दिवशीं पृथ्वीपुरीस वृंदावन वाशीयाचे प्रत्यक्ष दर्शन झालें व तो कृतार्थ, होऊन गेला. एदलाबाद येथें त्याच्या मठांत त्याची समाधी आहे.

चंद्रपूरचे मुख्यावर कर्नल मॉन्टगॉमरी प्रांताधिकारी होते. फिरंगी जातीचा मनाचा मोठा भावीक व शुद्ध आचरणाचा निगर्वी असा होता. त्याच्या फिरतीचा मुक्काम पारडी नजीक असतांना, त्याचे हाताखालील कारकूनांनीं नगाजी महाराजांचे दर्शनास जाणेची एक दिवस परवानगी मागितली साहेब म्हणाले तुमचा साधू कसा आहे मलाहि पाहतां येईल कां ? कारकून म्हणाले हो. आमचे साधूंची दृष्टी सर्वत्र सारखी असते त्यास सर्वत्र ईश्वर भरला आहे असें वाटते ते आपणास दर्शन देणेस हरकत घेणार नाहींत. नंतर साहेब नगाजी महाराजापुढें गुढग्यावर उभे राहून बायबलातील येशूची स्तुती वाक्ये म्हणूं लागला तोंच साहेबास नगाजीचे जागीं येशू खिस्ताचें दर्शन झालें. साहेब आश्चर्यानें आनंदी झाले एका परकीय इंग्लिश अधिकाऱ्याचा हा अनुभव हल्लीचे नास्तिक लोकांस सुमार्ग शिकवील यांत शंका नाहीं.

नगाजी महाराज एकदा अल्लीपूर येथें आपल्या सासुरवाडीस गेले. त्या गांवीं रघूसा तेली तेलाचा घाणा हांकून उपजिविका करीत असें त्याचा पुत्र आजारी होऊन मरणाचेद्वारी जाणार सर्व म्हणूं लागले. रघूसा तेल्यानें नगाजीचे पाय धरले. नगाजीनें आपलेच जागेंत भजन सुरूं केले. स्वतः एक क्षण अचेतन होऊन पडले. लवकर उठून बसून म्हणाले, जा घरीं तुझा मुलगा काळाचे तडाख्यांतून सोडवून आणला. रघूसा घरीं येऊन पाहतो तों मुलगा उठून बसून बोलत आहे. नगाजी महाराजांची कीर्ती ऐकून लोक दर्शनास लोटूं लागले.

त्यांचा शिष्यसमुदाय फार मोठा आहे. सोनेगांवकर गंगाधर, सिंदेवाडीचे मोरेश्वर, सदाराय बुवा, बोरी गांवचे गदाजी वगैरे नांवें सांगतां येतील. शके १७६६ आश्विन व॥ २ स समाधीस्त झाले. अगोदर एक महिना कीर्तन, गजर व संतर्पण सुरू होते. सेना न्हावी संत यांचे चरित्र बहुदा सर्वांस माहित आहे. श्री नगाजी महाराज न्हावी असून त्यांनीं मोठा अधिकार मिळवून समाधि घेतली. एका इंग्लिश विद्वान अधिकाऱ्याचें उद्गार खोटें मानूं नये. संत चरित्रें वाचून व खऱ्या संताचे दर्शनानुभव घेऊन कृतार्थ व्हावें.

---

**चुकीची दुरुस्ती :**—फेब्रुवारी अंकांत "पदहारी कृष्णदास" असें प्रसिद्ध केलें आहे, ते चूक आहे. "पयहारी" शब्द पाहिजे. दुधाचा आहार ज्याचा ते पयहारी (पयआहारी) कृष्णदास असे आहे.

# जीवन समृद्धि कशी साधाल ?

***************************

—संत विनोबा

हल्लींच्या चमत्कारिक शिक्षण-पद्धतीमुळें जीवनाचे दोन तुकडे पडतात. आयुष्याचीं पहिलीं पंधरावीस वर्षे मनुष्यानें जगण्याच्या भानगडींत न पडतां नुसतें शिक्षण घ्यावें आणि नंतर शिक्षण गुंडाळून ठेवून मरेपर्यंत जगावें !

ही रीत निसर्ग-योजनेच्या विरुद्ध आहे. हातभर उंचीचा बालक साडे तीन हात कसा बनतो हें त्याच्या किंवा इतरारांच्याहि ध्यानांत येत नाहीं. शरिराची रोज वाढ चाललेली असते. ही वाढ सावकाश, क्रमाक्रमानें, थोडी थोडी होत असते. त्यामुळें ती होत आहे ह्याचें भान हि राहत नाहीं. आजरात्रीं निजेपर्यंत दोन फूट उंची होती आणि उद्यां सकाळीं उठून पाहावें तो अडीच फूट भरली असें होत नाहीं. अमुक एका वर्षाच्या अगदीं अखेरच्या दिवसापर्यंत मनुष्यानें जीवनाविषयीं संपूर्ण बेजबाबदार राहिलें तरी चालेल, नव्हे —बेजबाबदार राहिलें पहिजे, आणि पुढच्या वर्षाचा पहिला दिवस उजाडला कीं लागलीच संपूर्ण जबाबदारी उचलल्यास सज्ज झालें पाहिजे अशी हल्लींच्या शिक्षण—पद्धतीची योजना आहे. संपूर्ण बेजबाबदारींतून संपूर्ण जबाबदारींत एकदम उडी मारावयाची म्हणजे ती एक हनुमान—उडीच झाली. असली हनुमान—उडी मारण्याच्या प्रयत्नांत हातपाय तुटले तर नवल काय ?

भगवंतांनीं अर्जुनाला कुरु—क्षेत्रांत भगवद्‌गीता सांगितली. भगवद्‌गीतेचे अगाऊ वर्ग घेऊन मग त्याला कुरुक्षेत्रांत ढकललें नाहीं. म्हणूनच ती गीता पचली. आम्ही ज्याला जीवनाच्या तयारीचें ज्ञान म्हणतों तें जीवनापासून अजीबात अलिप्त राखूं पाहतों. त्यामुळें सदर ज्ञानानें मरणाची तयारी होते.

वीस वर्षांचा उत्साही तरुण अभ्यासांत मग्न आहे. नाना प्रकारच्या उंच विचारांचे मनोरे बांधीत आहे. 'मी शिवाजीमहाराजांप्रमाणें मायदेशाची सेवा करीन. मी वाल्मीकी-सारखा कवि होईन. मी न्युटनसारखे शोध करीन,' एक नी दोन, काय काय कल्पना करतो. अशा कल्पना करण्याचें भाग्यहि थोड्यांना लाभतें. पण ज्यांना लाभतें त्यांची गोष्ट व्यायची. ह्या कल्पनांचें पुढें काय होतें ? '**वितीएवढेंसें पोट**' पण '**कोण तयाचा बोभाट !**' त्या पोटाचा प्रश्न पुढें उभा राहिला म्हणजे बिचारा दीन होऊन जातो. जीवनाची जबाबदारी म्हणजे 'क्या चीज है' ह्याची आजपर्यंत मुळीच कल्पना नव्हती. आणि आतां तर डोंगर पुढें उभा राहिला. मग काय करतो ? मग पोटासाठीं वणवण हिंडणारा शिवाजी, दुःखाचें रडगाणें गाणारा वाल्मीकि आणि कधीं नोकरीचा तर कधीं बायकोचा, कधीं मुलीच्या स्थळाचा व शेवटीं स्मशानाचा, शोध करणारा न्यूटन

असल्या. भूमिका घेऊन आपल्या कल्पनांचें समाधान करतो. हा हनुमान-उडीचा परिणाम आहे.

'काय हो ! तुम्ही पुढें काय करणार ?' —एका मॅट्रिकमधल्या विद्यार्थ्याला विचारलें.

'पुढें काय ? पुढें कॉलेजांत जावयाचें.'

होय. कॉलेजांत जायचें खरें. पण पुढें काय हा प्रश्न राहतोच.'

'प्रश्न राहतो पण त्याचा आतांच कशाला विचार करा ? पुढें पाहतां येईल.'

नंतर तीन वर्षांनीं त्याच विद्यार्थ्याला तो प्रश्न विचारला.

'अजून कांहीं विचार झाला नाहीं.'

'विचार झाला नाहीं म्हणजे ? पण केला होता का ?'

'नाहीं बुवा. विचार केलाच नाहीं. काय विचार करा ? कांहीं सुचत नाहीं. त्यांतून अजून दीड वर्ष वेळ आहे. पुढें पाहतां येईल'

'पुढें पाहतां येईल' हे शब्द तीन वर्षांच्या पूर्वी उच्चारले तेच. पण पूर्वीच्या आवाजांत बेफिकीरपणा होता. आतांच्या आवाजांत थोडी चिंतेची झांक होती.

पुन्हां दीड वर्षानें त्याच पृच्छकानें त्याच विद्यार्थ्याला— किंवा आतां 'गृहस्थां'ना म्हणा— तोच प्रश्न विचारला. त्यावेळीं चेहरा चिंताक्रांत होता. आवाजांतला बेफिकीरपणा पार उडून गेला होता. "ततः किं ततः किं ततः किं ततः किम्" हा शंकराचार्यांनीं विचारलेला सनातन सवाल आतां चांगलाच डोक्यांत घुमूं लागला होता. पण जवळ उत्तर नव्हतेंच.

आजचें मरण उद्यांवर ढकलतां ढकलतां एक दिवस असा उगवतो कीं ज्या दिवशीं मरावेंच लागतें. हा प्रसंग ज्यांच्यावर येत नाहीं, जे 'मरणाआधीं च' मरून राहतात, जे आपलें मरण डोळ्यांनीं पाहातात. जे मरणाचा अगाऊ अनुभव घेतात त्यांचें मरण टळतें. जे मरणाचा अगाऊ अनुभव घेण्याला कचरतात, धजत नाहींत, त्यांच्या उरावर मरण आदळतें. समोर खांब आहे ही गोष्ट आंधळ्याला त्या खांबाचा छातीला प्रत्यक्ष धक्का लागल्यानंतर समजतें, डोळसाला तो खांब अगाऊ दिसतो. म्हणून त्याचा धक्का त्याच्या छातीवर लागत नाहीं.

जीवनाची जबाबदारी म्हणजे कांहीं अगदीं मरण नाहीं. आणि मरण तरी काय एवढें मोठें 'मरण' आहे ? अनुभवाच्या अभावीं सारा बाऊ वाटतो. वास्तविक जीवन आणि मरण दोन्हीं आनंदाच्या वस्तु असल्या पाहिजेत. कारण आपल्या परमप्रिय पित्यानें परमेश्वरानें—त्या आपल्याला दिल्या आहेत. ईश्वरानें जीवन दुःखाचें निर्मिलेलें नाहीं. पण आपल्याला तें जगतां मात्र आलें पाहिजे. कोणता बाप आपल्या मुलांचे जीवन तळ-

मळीचें असावें अशी इच्छा करील ? त्यांतून ईश्वराच्या प्रेमाला, करूणेला कांहीं पार आहे ? तो आपल्या लाडक्या लेकरांसाठीं सुखाचें जीवन निर्माण करील कीं अट्टाहासाचें जीवन निर्माण करील ? कल्पना कराला ? प्रत्येक्ष च पहा ना. जी वस्तु आपल्याला जितकी जरूरीची ती तितकी सुलभतेनें मिळावी अशी ईश्वरानें योजना केली आहे. पाण्यापेक्षां हवेची जरूर जास्त. तर ईश्वरानें पाण्यापेक्षां हवा अधिक सुलभ केली आहे. जिथें नाक तिथें हवा ठेवली आहे. पाण्यापेक्षां अन्नाची जरूर कमी. म्हणून पाणी मिळविण्यापेक्षां अन्न मिळविण्याला अधिक परिश्रम पडतात. 'आत्मा' ही वस्तु सर्वांत अधिक महत्वाची तर ती प्रत्येकाला कायमची देऊनच टाकली आहे. अशी ईश्वराची प्रेमळ योजना आहे. तिचा प्रचार न करतां आम्ही निरुपयोगी जडजवाहीर जमा करण्याइतकें 'जड' बनलों तर आम्हांला उरीं फुटावें लागेल. पण हा आमचा जडतेचा दोष आहे. त्याचा बोल ईश्वराला नाहीं.

जीवनाची जबाबदारी ही भयानक वस्तु नाहीं. आनंदानें भरलेली आहे. जर ईश्वरानें निर्मिलेली जीवनाची सरळ योजना लक्षांत घेऊन भलभलत्या वासनांना आळा घालूं शकलों तर. पण जशी ती आनंदानें भरलेली वस्तु आहे तशी ती शिक्षणानेंहि भरलेली आहे. जो जीवनाच्या जबाबदारीला मुकला तो सर्व शिक्षण गमावून बसला म्हणून निखालस समजावें. पुष्कळांची अशी समजूत आहे कीं लहानपणापासून जीवनाच्या जबाबदारीचें भान जर मुलाला राहील तर त्याचें जीवन कोमेजून जाईल. पण जीवनाच्या जबाबदारीचें भान असण्यानें जर जीवन करपून जात असेल, तर जीवन ही वस्तु जगण्याच्या लायकीचीच नाहीं असें म्हणावें लागेल.

पण आज ही समजूत पुष्कळ शिक्षण-शास्त्रज्ञांचीहिं आहे. आणि ह्याचें मुख्य कारण जीवनाविषयींची दुष्ट कल्पना. जीवन म्हणजे 'कलह आहे असा' ग्रह झाला. इसापनीतींतल्या 'अरसिक' मानलेल्या, पण वास्तविक मर्म जाणणाऱ्या, कोंबड्यापासून बोध घेऊन जोंधळ्याच्या दाण्यापेक्षां मोत्याला मान देण्याचें सोडून दिलें तर 'जीवनांतला कलह' नाहींसा होऊन जीवनांत सहकार दाखल होईल. '**माकडाच्या हातीं मोत्यांची माळ**' ही म्हण ज्यांनीं निर्माण केली त्यांनीं मनुष्याचें मनुष्यत्व सिद्ध न करतां खरोखर मनुष्याच्या पूर्वजांविषयींचें डार्विनचें तत्वच सिद्ध केलें. '**मारुतीच्या हातीं मोत्यांची माळ**' ही गोष्ट ज्यांनीं रचली ते आपल्या मनुष्यत्वाला जागले.

जीवन जर भयानक वस्तु असेल, 'कलह' असेल, तर मुलांना त्यांत दाखल करूं नका आणि स्वतःहि तें जगूं नका. पण ती जर जगण्यालायक वस्तु असेल तर मुलांना त्यांत अवश्य दाखल करा. त्याशिवाय त्यांना शिक्षण मिळणार नाहीं. भगवद्‌गीता जशी कुरुक्षेत्रांत तसें शिक्षण जीवनक्षेत्रांतच दिलें पाहिजे— देता येईल. 'देतां येईल' हीहि भाषा बरोबर नाहीं. तेथेंच तें मिळूं शकेल.

अर्जुनापुढें प्रत्यक्ष कर्तव्य करीत असतां प्रश्न उत्पन्न झाला. त्याचें उत्तर देण्यासाठीं भगवद्गीता निर्माण झाली. ह्यालाच शिक्षण म्हणावयाचें. मुलाला शेतांत काम करूं द्या. त्यांत कांहीं प्रश्न उत्पन्न झाले तर त्यांचीं उत्तरें देण्यासाठीं सृष्टिशास्त्राची किंवा पदार्थविज्ञानाची किंवा इतर, जी जरूर असेल ती, माहिती द्या. हें खरें शिक्षण होईल. मुलाला रसोई करूं द्या. त्यांत जरूर तेथें रसायनशास्त्र शिकवा. पण मुख्य मुद्दा त्याला जीवन जगूं द्या. व्यवहारांत काम करणाऱ्या माणसालाहि शिक्षण मिळतच असतें. तसेंच लहान मुलालाहि मिळावें. फरक इतकाच कीं मुलाच्या आसपास जरूर तेथें मार्गदर्शन करणारीं माणसें हजर असावीं. हीं माणसेंहि 'शिकविणारी' म्हणून 'नियोजित' नसावीं. तींहि जीवत जगत असावीं, जशी व्यवहारांतली माणसें जीवन जगत असतात. फरक इतकाच कीं ह्या 'शिक्षक' म्हणविलेल्यांचें जीवन विचारमय असावें आणि त्यांतील विचार प्रसंगीं मुलाला समजावून सांगण्याची पात्रता त्यांना असावी. पण 'शिक्षक' म्हणून स्वतंत्र धंदा नको. 'विद्यार्थी' म्हणून कोणी 'माणसाच्या' बाहेरचा प्राणी नको. आणि काय करतां म्हणून विचारलें तर 'शिकतों' किंवा 'शिकवितों' असें उत्तर यावयास नको. 'शेती करतों' किंवा 'विणतों' अशासारखें शुद्ध धंदेवाईक म्हणा, व्यावहारिक म्हणा. पण जीवनांतलें उत्तर यावयास पाहिजे. ह्याला उदाहरण विद्यार्थी राम–लक्ष्मण आणि गुरु विश्वामित्र ह्यांचें. विश्वामित्र यज्ञ करीत होता, त्याच्या रक्षणासाठीं त्यानें दशरथापाशीं मुलें मागितलीं. त्याच कामासाठीं म्हणून दशरथानें मुलें दिलीं, मुलांचीहि आम्ही यज्ञरक्षणाचें 'काम' करण्यासाठीं जात आहोंत अशी जबाबदार भावना होती. त्यांत त्यांना अपूर्व शिक्षण मिळालें. पण राम–लक्ष्मणांनीं काय केलें म्हणाल तर त्यांनीं 'यज्ञरक्षण,' केलें 'शिक्षण मिळविलें' नव्हे. पण 'शिक्षण मिळालें' खरें. त्याला इलाज नाहीं.

शिक्षण हें कर्तव्यकर्माचें आनुषंगिक फळ आहे. जो जो कर्तव्यकर्म करतो त्याला तें कळत-नकळत मिळतें. मुलांनाहि तें तसेंच मिळालें पाहिजे. इतरांना तें ठेंचा खात मिळतें. लहान मुलांस अजून तितकी शक्ति आलेली नसल्यामुळें फारशा ठेंचा खाव्या लागणार नाहींत असें वातावरण त्यांच्या आसपास उभें करावें आणि तीं हळूं हळूं स्वावलंबी बनतील अशी अपेक्षा आणि योजना असावी. शिक्षण हें फळ आहे. आणि "**मा फलेषु कदाचन**" ही मर्यादा ह्याहि फळाला लागू आहे. शिक्षणासाठीं म्हणून एखादें कर्म करणें हेंहि सकाम झालें. आणि त्यांत हि "**इदमद्य मया लब्धम्**।"—आज मीं हें मिळविलें "**इदं प्राप्स्ये**" उद्यां मी तें मिळवीन, इत्यादि वासना आल्याच. म्हणून ह्या 'शिक्षण मोहांतून' सुटलेच पाहिजे. ह्या मोहांतून जो सुटला त्याला सर्वोत्तम शिक्षण मिळतें. आई आजारी आहे. तिची सेवा करण्यानें मला पुष्कळ शिक्षण मिळणार आहे. पण ह्या शिक्षणाच्या लोभानें मी आईची सेवा करता कामा नये. तर हें माझें पवित्र कर्तव्य आहे ह्या भावनेनें मीं आईची सेवा केली पाहिजे. किंवा आई आजारी आहे आणि तिची

सेवा करण्यानें माझें दुसरें कांहीं—ज्याला मी ' शिक्षण ' समजतों तें— बुडत आहे तर ह्या शिक्षण बुडण्यासच्या भीतीनें मी आईची सेवा टाळतां कामा नये.

प्राथमिक महत्त्वाच्या जीवनोपयोगी परिश्रमाला शिक्षणांत स्थान असावें असें कबूल करणाऱ्या कांहीं शिक्षण–शास्त्रज्ञांचें त्यावर विशेष असें म्हणणें आहे कीं हे परिश्रम हि ' शिक्षणाच्या ' दृष्टीनें च दाखल करावें. ' पोट भरण्याच्या दृष्टीनें नव्हे. आज ' पोट भरण्याचा ' जो द्वाड अर्थ प्रचलित आहे त्याला कंटाळून हें म्हणणें आहे, आणि तितक्यापुरतें तें योग्य आहे. पण मनुष्याला ' पोट ' देण्यांत ईश्वराचा हेतु आहे. प्रामाणिकपणें पोट भरणें ही गोष्ट जर मनुष्याला साधली तर समाजाची बहुतेक दुःखें आणि पातकें नाहींशीं होणार आहेत. म्हणूनच मनूनें " **योऽर्थे शुचिः स हि शुचिः ।** " जो आर्थिक दृष्ट्या पवित्र तोच पवित्र— असे यथार्थ उद्गार काढले आहेत. ' **सर्वेषामविरोधेन** ' असें जगावें ह्या शिक्षणांत सर्व शिक्षण येऊन जातें. अविरोध–वृत्तीनें शरीरयात्रा चालविणें हें मनुष्याचें प्रथम कर्तव्य आहे. हें कर्तव्य करण्यानें च त्याची आध्यत्मिक उन्नति होणारी आहे. म्हणून उपकृत परिश्रम करणें ह्यालाच शास्त्रकारांनीं शरीरयात्रा सिद्ध करण्यासाठीं 'यज्ञ' हें नांव दिलें आहे. "**उदर-भरण नोहे जाणिजे यज्ञ कर्म**" हें **वामनपंडितांचें** वचन प्रसिद्ध आहे. म्हणून मी 'शरीर-यात्रा' चालविण्यासाठीं परिश्रम करीत आहे ही भावना योग्य आहे. ' शरीर-यात्रा ' म्हणजे माझ्या साडे तीन हात शरिराची यात्रा असें न समजतां समाज शरिराची असा उदार अर्थ चित्तांत ठसला पाहिजे. माझी शरीर–यात्रा म्हणजे समाजाची सेवा, आणि म्हणजेच ईश्वराची पूजा, इतकें समीकरण दृढ झालें पाहिजे. आणि ह्या ईश्वरसेवेंत देह झिजविणें हें माझें कर्तव्य असून तें मीं केलें पाहिजे अशी जाणीव प्रत्येकाला असली पाहिजे.

अर्थात् ती लहान मुलालाहि पाहिजे. त्यासाठीं त्याला आपल्या मगदुराप्रमाणें जीवनांत भाग घेण्यास अवकाश दिला पाहिजे. आणि जीवन हें मुख्य केंद्र करून त्याच्या आसपास जरूरीप्रमाणें सर्व शिक्षण उभें केलें पाहिजे.

अशानें जीवनाचे दोन तुकडे होणार नाहींत. जीवनाची जबाबदारी अचानक येऊन पडल्यानें उत्पन्न होणाऱ्या अडचणी उत्पन्न होणार नाहींत. शिक्षण न कळत मिळत राहील. पण शिक्षण–मोह चिकटणार नाहीं, आणि निष्काम कर्माचें वळण लागेल.



# सीतेला भुरळ पाडणारा तो कांचनमृग

**मारीच सर्व परिस्थिति ओळखून होता. रावणानें आड मार्गानें जाऊं नये...असें त्याला वाटत असे. रावण सीतेवर भाळून जाऊन मारीचानें ती मिळविण्यांत आपणास सहाय्य करावें या इच्छेनें रावण त्याच्याशीं बोलत होता. तेव्हां.—**

## राम म्हणजे मूर्तिमंत धर्म

मारीच रावणाला उद्देशून म्हणाला, "तुझं हें बोलणं ऐकून मला अपार दुःख होत आहे. तुझी खोटी स्तुति करायची माझी इच्छा नाहीं. स्तुतीचे शब्द कानांना मधुर लागतात. उलट, कटु पण योग्य उपदेश करणारा एखादाच असतो. अशा उपदेश ऐकणारा तर शोधून काढावा लागतो. असं असलं तरी सत्य भाषण करणं, हें माझं कर्तव्य आहे असं मला वाटतं. आज मी गोड गोड बोललों तर तुझे कान सुखावतील, हें खरं; पण त्यामुळें तूं आपल्या विनाशाप्रत मात्र गेल्याशिवाय राहणार नाहींस."

"तुझ्या दूतांनीं तुला रामाविषयींचा खरा वृत्तांत दिलेला नाहीं, हें उघड आहे. इतरांच्या सांगण्यावर या बाबतींत तूं विश्वास ठेवलास तर फशीं पडशील हें लक्षांत ठेव. रामाच्या हातून कोणताच अपराध घडलेला नाहीं. तो आपल्या पित्याच्या शब्दासाठींच केवळ या अरण्यांत वनवासी होऊन आला आहे. तो दुर्बळ नाहीं कीं मित्रा नाहीं- युद्धकलेंत आणि सामर्थ्यांत अजोड असा तो एक महापराक्रमी रणधुरंधर आहे.

"त्याचं शत्रुत्व बुद्धिपुरस्सर पत्करून आपल्या साम्राज्याचा आणि आपल्या कुळाचा विनाश आपणहून ओढवून आणूं नकोस. तुझ्या मनांत जें कांहीं चाललं आहे, तें पाहातां सीतेनें तुझ्या विनाशासाठींच केवळ जन्म घेतला असावा, असं वाटूं लागतं. तुझ्या आततायीपणामुळें राक्षसकुळाचा आणि लंकेचा नाश तूं अधिकाधिक जवळ मात्र आणीत आहेस.

"कुठल्या वैऱ्यानें हा भयंकर विचार तुझ्या मनांत भरवून दिला आहे? स्वतः तूं, तुझं साम्राज्य आणि उभं राक्षसकुळ यांना विनाशाच्या खाईत लोटणारा हा नीच उपदेश तुला करणारा हा आहे तरी कोण?

"राम सुखविलासांत लोळणारा आणि पाताळयंत्री असा पुरुष आहे, हें तुला कुणी सांगितलं? राम म्हणजे मूर्तिमंत धर्म आहे. धर्माच्या सेवेसाठींच त्यानें आपलं सारं सामर्थ्य नि शौर्य अर्पण केलं आहे. देवलोकीं इंद्र तसा मानवलोकीं राम श्रेष्ठ आहे.

## हा विस्तवाशीं खेळ

" सीतेकडे पापी दृष्टीनें पाहाण्याचं धैर्य तरी तुला कसं होतं ! ती कधीं काळीं तरी आपला स्वीकार करील, हा भ्रम तुझ्या मनांत उगवतो कसा ! अरे, सूर्याला फसवून त्याचा प्रकाश चोरणं कालत्रयीं तरी कुणाला शक्य होईल काय ? म्हणे, रामापासून मी तिला पळवून आणीन. जनककन्येच्या आसपास फिरकलास तरी निमिषार्धात तूं जळून खाक होशील. रामाच्या धनुष्यांतून सुटलेल्या बाणांना तुला बळी पडायचं आहे का ? आपल्या विनाशाचा ध्यास तुला कसला लागला आहे ! रामाच्या संरक्षणाखालीं धगधगत राहिलेल्या ज्वालेशीं खेळ खेळूं नकोस.

" संपूर्ण विचार करण्यापूर्वी पुढें पाऊल टाकणं कधींच श्रेयस्कर नसतं. तुझ्या हातून रामाचा युद्धांत पराजय होईल हीं तर कालत्रयीं शक्य न होणारी अशी गोष्ट आहे. मी काय सांगतो आहे तें नीट ऐक. एक काळ असा होता, कीं स्वसामर्थ्याच्या अभिमानाच्या धुंदींत मी विश्वामित्रानें आरंभिलेल्या अनेक यज्ञांत विघ्नं आणीत असें. त्यावेळीं राम हा तर कोंवळा पोर होता नुसता ! पण असं असूनहि, दशरथाच्या सांगण्यावरून, विश्वामित्रानें आपल्या यज्ञवेदीचं संरक्षण करण्यासाठीं त्यालाच आणलं होतं. विश्वामित्राला रामाच्या सामर्थ्याची चांगलीच जाणीव होती. यज्ञकुंडांत नासक रक्त आणि मांस यांचा वर्षाव करुन मोडता आणावा या उद्देशानें मी यज्ञस्थळीं गेलों असतां, रामाची नि माझी समोरासमोर गांठ पडली. काय घडलं असेल असं वाटतं तुला त्यावेळीं ! एका बाणांतच त्यानें सुबाहूला जागच्या जागीं लोळवलं आणि दुसरा बाण सोडून त्यानें मला समुद्रांत दूर भिरकावून दिलं. त्यावेळीं पोर असलेला राम आतां तरणाबांड पुरुष होऊन आला आहे. त्यावेळीं त्याचं सामर्थ्य एवढं होतं, तर आज तें केवढं असेल !

## हा पापमार्ग सोड

" त्याचा क्रोध तूं विनाकारण आपल्यावर ओढवून घेऊं नकोस. आज सुख-समृद्धीचा अपार उपभोग घेत असलेल्या राक्षसवंशाला जाणूनबुजून विनाशाप्रत नेऊं नकोस. सीतेविषयीं तुझ्या मनांत फोफावत चाललेल्या कामवासनेचं रोपटं अगदीं मुळापासून निपटून टाकलंस तरच कांहीं आशा आहे. आपल्या मूर्ख हट्टालाच चिकटून राहिलास तर मात्र धडगत नाहीं. अग्नीच्या भक्षस्थानीं पडलेली लंकानगरी माझ्या अंतश्चक्षूंना दिसूं लागली आहे. पार विध्वस्त होऊन गेलेल्या या नगरींत राक्षसांच्या प्रेतांचा खचच्या खच पडला आहे, अनाथ झालेलीं बायका-पोरं धाय मोकलून आक्रोश करीत आहेत. रामाविषयीं तुझ्या मनांत कांहीं राग असेल तर समोरासमोर त्याच्याशीं युद्ध करून मृत्यूचा स्वीकार कर. मरायचंच असलं तर वीरमरण तरी येऊं दे पण या पापमार्गानें मात्र जाऊं नकोस. मला

आपल्याबरोबर खेंचूं नकोस. मुकाट्यानें परत फीर आणि सुखाचा संसार करीत कालक्रमणा कर. नंपेक्षां यमदेवाला लंकेस भेट देण्याचं आमंत्रण मात्र देऊन बसशील !”

मारीच सांगत होता रावणाच्या कल्याणासाठीं, पण त्याला कोठें तें पटत होतें ! कामवासनेनें धुंद झालेल्याला असल्या उपदेशाचें काय होय ? एखाद्या व्याधिग्रस्तानें औषध घेण्याचें नाकारावें, तसा मारीचाच्या उपदेशाचा खुशाल अव्हेर करीत तो म्हणाला,

**उपड्या घड्यावर पाणी**

राजानें एखादी गोष्ट करावी कीं करूं नये, याविषयीं त्यास सल्ला हवा असेल तरच त्याच्या मंत्र्यांनीं त्याच्याशीं साधकबाधक विचारविनिमय करावा. मी असल्या उपदेशासाठीं तुझ्यापाशीं आलों नाहीं. सम्राटाच्या नात्यानें मी जें कांहीं करायचं ठरवलं आहे तें तुझ्या कानावर घालण्यासाठीं इथे आलों आहे. या कामीं तुझं साहाय्य मी अपेक्षित आहे. आपल्या राजनिष्ठेचा विसर तुला पडला नसता तर हा उलटा उपदेश करायला तूं धजला नसतास. सर्व गोष्टींचा सारासार विचार करूनच मीं करायचा तो निर्णय केला आहे. ज्या क्षुद्र कीटकाची तूं एवढी स्तुति चालवली आहेस, त्याला युद्धाचं औपचारिक आव्हान मीं द्यावं, हें संभवतं तरी का ? आपल्या स्वतःच्या राज्याबाहेर वनवासी होऊन बाहेर पडलेला, एका क्षुल्लक स्त्रीच्या जाळ्यांत सांपडल्यानें फशी पडलेला, स्वतःच्या अधिकारावर उदक सोडून कफल्लक झालेला, यापलीकडे या मूर्ख रामाची काय किंमत आहे ? त्याच्या स्त्रीचं अपहरण करून त्याची नाचक्की करून सोडणं एवढा एकच योग्य मार्ग मला दिसत आहे. या निर्णयांत काडीमात्र बदल मी होऊं देणार नाहीं. तूं या बाबतींत जें कांहीं करावंस असं मला वाटतं तें तूं करशील अशी मला आशा आहे. हें मागणं कांहीं फार नाहीं. एका सुंदर हरणाचं रूप धारण करून सीतेचं लक्ष आकर्षित करून घे. तुला पकडण्यासाठीं ती रामाला पाठवील, तेव्हां त्याला चकवीत तूं दूर घेऊन जा आणि तेथूनच रामासारखा आवाज काढून आक्रोश कर, 'हा सीते ! हा लक्ष्मणा !' हें ऐकताच रामाच्या जिवाला कांहीं अपाय आहे, असं सीतेला वाटेल आणि ती बळेंबळेंच लक्ष्मणाला त्याच्या साहाय्याला पाठवील. ती एकटी आहे असं पाहून मी तिचं अपहरण करीन आणि तिला लंकेला नेऊन ठेवीन. त्यानंतर तूं हवं तें कर. पण एवढं काम तूं माझ्यासाठीं केलं नाहींस तर निष्कारण प्राणाला मात्र मुकशील.”

**विनाशकाळ जवळ आला.**

मारीचानें स्वतःशीं विचार केला, 'विनाशकाल जवळ येऊन ठेपल्यानंतर याची बुद्धि विपरीत व्हावी यांत नवल नाहीं. पापी कामवासनेच्या नादीं लागल्यामुळें

रावण मृत्यूच्या वाटेला लागला आहे. अशा चांडाळाच्या हातून मरण येण्यापेक्षां तें रामाच्या हातून आलं तर मी धन्य होईन. निदान शत्रूच्या हातून मरण आलं तरी मी धन्य होईन.'

आणि त्यानें रावणाला हवें तें साहाय्य देण्याचें मान्य केलें.

तो म्हणाला, "काय सांगायचं तें माझ्या परीनें मीं तुला सांगण्याचा प्रयत्न केला आहे. पण तुझ्या भल्याची गोष्ट ऐकायची तुझी तयारी दिसत नाहीं. तुझ्या आदेशानुसार मी वागलों तर माझा मृत्यु अटळ आहे, पण त्यापेक्षांहि तुझ्या साम्राज्याच्या पाठोपाठच तुझा विनाशहि सत्वरच होणारच आहे. राक्षसजात औषधापुरतीहि पृथ्वीवर उरणार नाहीं. तुझ्या वैभवाचा हेवा वाटणाऱ्या, आपल्या सर्वनाशाची इच्छा धरणाऱ्या कुणा वैऱ्यानेंच तुला या मोहांत पाडलं आहे. तुझ्या हातून मरण येण्यापक्षां ज्याच्याविषयीं माझ्या मनांत नितान्त आदर आहे, अशा शत्रूच्या हातून मरण आलेलं मला अधिक आवडेल. चल, जाऊं या तर दंडकारण्याकडे."

हें ऐकतांच रावणाला अत्यानंद झाला. मारीचाला प्रेमभरानें आलिंगन देत तो म्हणाला, "प्रिय मारीचा..."

मग ते दोघे रथांत बसून दंडकारण्यांत जावयास निघाले. अनेक नगरें, पर्वत, नद्या आणि साम्राज्यें यांवरून भरारी मारीत तो रथ दंडकारण्यांत येऊन पोंचला. वरूनच त्यांनीं रामाच्या आश्रमाचें गुप्तपणें निरीक्षण करून घेतलें.

आश्रमापासून कांहींशा अंतरावरच त्यांनीं रथ खालीं आणला. मग मारीचाचे हात आपल्या हातांत घेत आणि रामाच्या आश्रमाकडे अंगुलिनिर्देश करीत रावणानें त्याला ठरल्याप्रमाणें करावयास सांगितलें.

**सुंदर कांचनमृग**

तत्क्षणींच मारीचानें एका अद्भुत, सुंदर हरणाचें रूप धारण केलें. इंद्रधनुष्यासारख्या चित्रविचित्र रंगांनीं त्या हरणाचें अंग फुललें होतें. तें अपार लावण्य पाहून पाहणाऱ्याच्या डोळ्यांना भुरळ पडली असती. सोनें, रुपें, हिरेमाणकें, फुलें यांचा सडाच जणूं त्याच्या रेशीमकांती त्वचेवर पडला होता. एखाद्या कांचनमय देहावरून रत्नांचा जिवंत ओहोळच वाहात जावा, तसा त्याचा डौल होता.

असें हें सुंदर हरीण रामाच्या आश्रमाच्या परिसरांत बागडत राहिलें होतें. कधीं विश्रांति घेत बस, कधीं उगीच धावत सूट; कधीं खालीं मान करून कोवळं गवत कुरतड, तर कधीं मान उंचावून झाडांचीं पानं खा; कधीं आश्रमाच्या अगदीं जवळ जा, तर कधीं एकदम उडी घेऊन आसपासच्या झाडींत दिसेनासें हो, कधीं एखाद्या हरणांच्या कळपांत जाऊन मिसळ, कधीं अगदींच एकलकोंडेपणानें फिरत राहा, असा त्याचा खेळ चालला होता. त्याचा वास आला रे आला कीं बाकीचीं हरणें भयभीत होऊन सैरावैरा पळत सुटत.

अंगणांतील फुलें खुडणाऱ्या सीतेचें त्या कांचनमृगाकडे लक्ष गेलें आणि अनिमिष नेत्रांनीं त्याच्याकडे पहात ती जागीं खिळूनच गेली. त्या हरिणानेंही तिच्याकडे वळून पाहिलें आणि तिच्या अगदीं जवळ येऊन तें लाडिकपणें उड्या मारूं लागलें.

"अय्या, पाहिलंत का?" सीता राम-लक्ष्मणांना साद घालीत अधीरतेनें ओरडली, "लौकर या...लौकर या."

राम-लक्ष्मणांनीं बाहेर येऊन पाहिलें आणि तेहि दोघे दिङ्मूढ होऊन त्या कांचनमृगाकडे निश्चळ नजरेनें पाहात राहिले.

लक्ष्मणाच्या मनांत संशय आलाच. हें कांहीं साधेंसुधें हरीण दिसत नाहीं. हा खोटें रुप घेऊन आलेला राक्षस असला पाहिजे. राम-लक्ष्मणांच्या दोघांच्याही कानांवर मारीच हरणाचें रूप घेऊन लोकांना कसें फसवितो, याचा वृत्तांत पूर्वीच आला होता. त्याच्या सौंदर्याची भुरळ पडून लोक पाठलाग करूं लागले, कीं त्यांना चकवीत चकवीत दूर नेऊन त्यांचे प्राण तो घेत असे, हें त्यांना माहीत होतें.

लक्ष्मण म्हणाला, "हें कांहीं साधंसुधं जनावर आहेसं वाटत नाहीं. ही एखाद्या राक्षसाची किमया असली पाहिजे."

**मला तें हरीण हवं**

यावर सीतेनें आग्रह धरला, "मला हें हरीण हवं आहे. आपण तें पाळूं या इथें. इतकं सुंदर जनावर मी आज प्रथमच पाहात आहें. पहा......कसं बागडतंय तें! त्याचे रंगहि किती किती सुंदर आहेत!"

सारखें तिचें एकच पालुपद चालू होतें,

"मला तें हरीण हवं आहे. मला तें हरीण हवं आहे."

मग ती रामाकडे वळून म्हणाली, "आपण आतां लवकरच अयोध्येला परत जाऊं तेव्हां इथनं एखादी तरी दुर्मिळ वस्तु आपण न्यायला नको का? आपल्या प्रासादांतील अंतर्महालांतून याच्यासारखं सुंदर हरीण बागडतांना किती सुंदर दिसेल! भरतभावोजींना तर किती आनंद होईल! त्यांना या हरिणाची मला भेट द्यायची आहे. आणा ना हो ते पकडून, आणा ना ते!"

आपली ही मागणी लक्ष्मणाला एकंदरींत आवडलेली नाहीं हें तिच्या लक्षांत आलें होतें. म्हणूनच ती रामाकडे अधिकाधिक हट्ट धरुन बसली होती. आपल्याला कितीही प्रिय असलेली व्यक्ति जेव्हां आपल्या इच्छेआड येते तेव्हां तिचा आपल्याला राग आल्याशिवाय रहात नाहीं. सीतेचेंही असेंच झालें होतें.

एखादी वासना माणसाच्या मनांत थैमान घालूं लागली म्हणजे काय होतें याचें अतीसुंदर वर्णन भगवद्गीतेंत केलेलें आहे, त्याचा प्रत्यय येथें सीतेच्या बाबतींत येतो.

"पाहा...पाहा..." सीता उद्गारली, "पाहा! क्षणापूर्वी तें सोन्याचं केलेलं दिसत होतं नि आतां तर रुप्यासारखं दिसतं आहे! तें जिवंत हातीं लागलं नाहीं तर त्याचं कातडं तरी आणा. असलं सुंदर हरीण पुन्हा दिसायचं नाहीं. त्याच्या

कातड्यावर बसायला कसं मऊ मऊ वाटेल, पाहा तें चाललं. पकडा ना हो त्याला. पकडा ना.. निदान त्याचं कातडं तरी आणा !

## हट्ट पुरविणें भाग

थोड्या वेळानें पुन्हा ती म्हणाली, "इतकं सुंदर हरीण या अरण्यांत मी आजवर पाहिलेलं नाहीं. पाहा...पाहा तरी, तें कसं नक्षत्रपुंजासारखं चकाकत आहे !"

तिचा हट्ट पुरविण्यावांचून रामाला आतां गत्यंतरच उरलें नव्हतें.

तो स्वतःशींच विचार करूं लागला, 'लक्ष्मण म्हणतो त्याप्रमाणें हा खरोखरच राक्षस असेल तर त्याचा वध करायला हें कारण अधिक संयुक्तिक आहे. त्यांत भिण्यासारखं काय आहे ! नाहीं जिवंत हातीं लागलं तर एका बाणांत आपण त्याला खालीं पाडूं नि त्याचं कातडं सीतेला आणून देऊं. तिला इतकंच आहे तर आणून दिलंच पाहिजे.'

लक्ष्मणाला त्यानें आपलें धनुष्य आणि बाण आणायला सांगितलें. लक्ष्मणाला हें आवडलें नाहीं, पण कितीही झालें तरी रामाची आज्ञा होती ती !

राम म्हणाला, "मी परत येईपर्यंत इथेंच सीतेजवळ राहा. तें हरीण जिवंत नाहीं मिळालं तरी त्याचं कातडं तरी घेऊन मी लवकरच परत येईन. माझी कांहीं काळजी करूं नको. हरणाचं रूप घेतलेला हा राक्षस असला तरी विवंचना करण्याचं कारण नाहीं. वातापीची स्थिति झाली तीच याचीहि होईल. वातापीने अगस्त्यांना फसविण्याचा प्रयत्न केला तसाच प्रयत्न हा राक्षसहि करणार असेल तर बापडा स्वतःच्याच षड्यंत्राला तो बळी पडणार आहे. हा राक्षस काय किंवा हरीण असला काय, दोन्हीहि माझ्या दृष्टीनें सारखेच आहेत."

जातांना पुन्हा त्यानें लक्ष्मणाला सीतेवर नीट लक्ष ठेवण्यास सांगितलें.

नियतीनें आतां दुर्दैवाचा फांसा टाकला होता. नेहमीं उतावळेपणानें वागणाऱ्या लक्ष्मणाच्या मनांत अचूक संशय निर्माण झाला होता. उलट, नेहमीं सावधानपणें पावलें टाकणाऱ्या रामानें सीतेचा मूर्ख हट्ट पुरवायचें ठरविलें होतें; इतकेंच नव्हे, तर लक्ष्मणानें दिलेली पुढील संकटाची सूचना लाथाडून तो आतां कांचनमृगचा पाठलाग करण्यासाठीं निघाला होता.

## हरिणाचे डावपेंच

मारीचानें बराच वेळ रामाला खेळविलें. त्याच्या दृष्टीच्या कक्षेबाहेर तर आपण जाणार नाहीं, पण त्याच्या हातींहि सहजासहजीं सांपडूं शकणार नाहीं एवढें अंतर ठेवून, तो रामाला आपल्या मागून धावायला लावीत होता. अधूनमधून थकल्यासारखें करून रामाकडे पाहात होता. दुसऱ्याच क्षणीं जणूं कांहीं आपण घाबरलों आहोंत असा अविर्भाव करून तो जोरानें पळत होता. त्याचे कान टवकारलेले होते आणि पळतांना तो आपले पुढील खूर छातीला लागतील एवढे उचलीत होता. अकस्मात्

तो झाडींत दिसेनासा होई आणि तितक्याच अकस्मात्पणें एखाद्या लहानशा उंचवट्यावर उभें राहून आपल्या लावण्याचें प्रदर्शन करी. मधूनच तो आपण अगदीं थकून गेलों आहोंत, असें सोंग करी. रामाला वाटे, आतां सांपडलें हें हरीण आपल्या तावडींत ! पण तेवढ्यांत तें पुन्हां पळूं लागे.

रामाचा आश्रम आतां खूप मागें राहिला आहे असें पाहून, आतां फार वेळ काढण्यांत अर्थ नाहीं हें मारीचानें हेरलें. आपला अंत जवळ येऊन ठेपला आहे या गोष्टीची त्याला मनोमन जाणीव झाली. रामानें धनुष्यबाण लावला नि तो त्या हरिणाच्या दिशेनें सोडला. बाणानें आपलें काम चोख बजावलें. मारीच्याच्या अगदीं मर्मस्थानीं तो बाण लागला. तत्क्षणींच त्यानें आपलें खोटें रूप टाकून दिलें आणि तो रामाच्या आवाजासारखा आवाज काढून ओरडला, " हा सीते, हा लक्ष्मणा ! " निमिषार्धांतच त्याची प्राणज्योत मालवली.

राम स्वतःशींच म्हणाला, ' लक्ष्मणाचा तर्क बरोबर होता तर ! '

लगेच त्याच्या मनांत विचार आला, ' मारीचाचा आवाज ऐकून सीतेची फसवणूक होईल. माझ्या प्राणांना धोका आहे. या कल्पनेनें ती भयभीत होऊन जाईल. पण तरीहि आपल्याला भ्यायचं काय कारण आहे ? लक्ष्मण आश्रमांत आहेच. '

लक्ष्मणासारखा निष्ठावंत भाऊ आपल्याला आहे या विचारानें त्याचा ऊर अभिमानानें भरुन आला. तिकडे आश्रमांत काय चाललें आहे आणि लक्ष्मणाला काय काय शब्द ऐकून घ्यावे लागत आहेत, याची त्याला कशी कल्पना असणार ?

नियतीनें दुर्दैवाचा फांसा टाकला होता तो असा.


## ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

**३६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४**

**तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण. होलसेल व रीटेलर्स**

# ह. भ. प. दासगणूमहाराज यांचा करारीपणा

श्रीगोंद्याहून दासगणूंची बदली जामखेडास झाली. हें गांव नगरपासून २५–२६ कोस दूर आहे. आज मोटारीची सोय चांगली झाली आहे. पण त्या काळीं म्हणजे शके १८२० मध्यें हें गांव सर्वच दृष्टींनीं फार त्रासाचें होतें. इंग्रजी ( त्या वेळीं ) व मोंगलाई यांच्या सीमा एकमेकांस भिडलेल्या असून खालसा नि संस्थानी गांवांची सरमिसळ झालेली होती. त्यामुळें चोर, दरोडेखोर वा इतर अपराधी यांना मोठें निर्धोक कुरण सांपडे. या ठिकाणची बदली म्हणजे एक प्रकारची हद्दपारीची शिक्षाच असे. अशा या जामखेडांतहि श्रीदासगणूंनीं आपले दिवस स्वतः हंसत व दुसऱ्यास हंसवीत अत्यंत आनंदांत काढले.

कोणत्याहि परिस्थितींत समाधानी राहण्यास बाहेरच्या अनुकूल परिस्थितीपेक्षां मनाची घडण कांहीं वेगळ्या प्रकारची आणि उच्च पातळीची असावी लागते. अशी मनोरचना ज्याची आहे वा ज्यानें ती प्रयत्नपूर्वक प्राप्त करून घेतली आहे, त्याच्या आनंदांत प्रतिकूल परिस्थितीमुळेंहि फारशी उणीव कधीं येत नाहीं.

## जामखेडचें महत्त्व

या जामखेडाशीं श्रीदासगणूंच्या पूर्वायुष्यांतील अनेक रोमहर्षक प्रसंग निगडीत झालेले आहेत. पण ज्यामुळें श्रीदासगणूंचा कीर्तिसौरभ अखिल महाराष्ट्रभर दरवळला, त्या कीर्तनाचा पहिला धडाहि या जामखेड गांवांतच गिरविला गेला. गुरूपदेशानें अंतरंगांत रुजलेल्या भक्तिच्या सूक्ष्म बीजाला पहिला दृश्य अंकुर याच ठिकाणी फुटला.

जामखेडास एका उत्सवप्रसंगी आमंत्रण दिलेला हरदास आला नाहीं. उत्सव-समारंभ कीर्तनावांचूनच पार पाडावा लागला. त्यावरून एकदां तेथील मामलेदार शेटफळकर दासगणूंस म्हणाले, "अरे गणपतराव, लावण्यापोवाड्यांत आपल्या बुद्धीचा अपव्यय करतोस, त्याऐवजीं जर कांहीं आख्यानें बसविलीं असतीस तर तुझ्या काव्यशक्तिचें खरें चीज झालें असतें. पण नव्हेच तें. तुम्हांला होळीच्या उत्सवाचें मानकरी होण्यांतच भूषण वाटतें."

"कां बरें ! मला देवळांतील कीर्तन करतां येणार नाहीं कीं काय ! पुढच्या एकादशीला माझेंच कीर्तन ठरवा."

"म्हणजे माझी फजिती करून घेऊं होय तुझें कीर्तन ठरवून ? तुला काय ! कशाचेंच कांहीं बंधन नाहीं. मला भोंवतींचा व्यवहार पाहिला पाहिजे. कीर्तन म्हणजे मुंज्याच्या पारावरचा तुम्ही घालतां तसला डफ तुणतुण्याचा गोंधळ नाहीं. विद्वत्ता लागते त्याला !"

## पुढची एकादशी माझी

"हें पहा, अनुभवावांचून बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कीर्तनाची संवय व्हावी म्हणून कोणी तरी शाळामास्तर, पोस्टांतला माणूस, कचेरींतील कारकून असे धरून

आणून उभे करतां ना ? मीहि उभा राहीन एकादे दिवशीं. काय होतें पहा तरी ! पुढची एकादशी माझी ठरली बरं ! ”

हें बोलणें कोणींहि विश्वासार्ह मानलें नाहीं. श्री. हरी रघुनाथ तपस्वी हेडमास्तर, श्री. बापूसाहेब वरखेडकर सबरजिस्टार, श्री. दत्तोपंत खैर पोस्टमास्तर इत्यादींनीं एखाद्या पाक्षिक बैठकीसारखें हें कथेचें चक्र सवयींकरितां हौसेनें सुरू केलें होतें. श्री. दत्तोपंत खैर यांना मात्र आपल्या मित्राच्या सद्गुणांचा पूर्ण विश्वास होता ! गणपतराव जें म्हणेल तें करून दाखवील, असा भरंवसा असल्यामुळें त्यांनीं मामलेदारांस भर देऊन दासगणूंचें कीर्तन ठरविलें. श्रीदासगणूंनींहि सर्वांस चकीत करून सोडावयाचें, असा मनोमन निश्चय केला. त्यासाठीं संत दामाजीचें आख्यान स्वतंत्रपणें अगदीं नवीन असें रचलें. लावण्या म्हणणाऱ्या आपल्या साथीदारांकडून तें चांगलें पाठ करून घेतलें. इयातखाँ सरदारखाँ या नांवाचे एक मुसलमान गृहस्थ दासगणूंच्या सवेंच पोलिसांत हवालदार होते. त्यांना दासगणूविषयीं फार प्रेम आणि आदर वाटत असे. ते यांच्या लावण्या खड्या सुरानें मोठ्या सुंदर म्हणत असत. दासगणूंकरितां काय वाटेल तें करण्याची तयारी असलेले ते मोठे निष्ठावंत गृहस्थ होते. त्यांनीं दाढी वगैरे काढून गंध लावून रुमाल, उपरणें अशा वेषांत श्रीदासगणूंच्या या पहिल्या कीर्तनाची साथ केली. कीर्तन ऐकण्यासाठीं नुसता तोबा उडाला होता. ‘तमाशाच्या शृंगारिक लावण्या रचणारा गणपतराव कीर्तन करणारा आहे. पाहूं तरी काय सांगतो तें !’ या कुतूहलानेंच बरीचशी मंडळी गोळा झाली होती. जवळ जवळ दोन तास कीर्तन झालें. टर उडविण्याकरितां आलेल्या मंडळींना नमनाच्या समाप्तीनंतर पूर्वरंगास जो भारदस्त आरंभ झाला, त्यांत आपला विचार कृतींत आणण्यास अवसरच गवसला नाहीं.

**लोक चकित झाले**

आख्यानास आरंभ होतांच त्यांतील दुष्काळाचें वर्णन, दामाजीची उदारता, जेवणाच्या पंक्तीचा थाट यांत मंडळी अगदीं रंगून गेली. दामाजीला धरणें येतांच संत दामाजीच्या साध्वी पत्नीनें तुळशीवृंदावनाजवळ उभे राहून—

> **“हे अनंत पंढरिराया ।**
> **कां पातळ केलीस माया विठ्ठला ।**
> **चुकलें मी काय सेवेला ।**
> **म्हणुनियां मोकलिसी मजला । ”**

अशी जी करुणा भाकली, तिनें सर्वांस रडविलें. परमेश्वरानें आपल्या भक्ताच्या संरक्षणार्थ महाराच्या रूपानें बेदरास धांव घेतांच श्रोत्यांच्या मनांतील सर्व किल्मिषें भक्तिरसाच्या पवित्र गंगेंत वाहून गेलीं.

कीर्तनाचा थाटहि कांहीं वेगळाच. बाष्कळ विनोद नाहीं. तारण्याचा गडगडाट नाहीं. ओढून ताणून कोट्या करणें नाहीं. कृत्रिम हावभाव नाहीं. पांडित्याचें उसनें प्रदर्शनहि नाहीं. आबालवृद्धांस सहज समजेल असा सोपा विषय, अकृत्रिम साधेपणा, हृदयाचा ठाव घेईल अशी जिव्हाळ्याची भाषा, हृदयांतून उमटणारें भक्तिप्रेम आणि या सर्वांना मधुरपणें उठाव देईल असें स्वकृत प्रेमळ काव्य. हें सर्व ऐकून लोक आश्चर्यचकित झाले.

'गणपतराव दिसतो वाटतो, तसाच केवळ नाहीं. कांहीं वेगळाच असला पाहिजे' अशीच बहुतेकांची भावना झाली. यानंतर मधून मधून श्रीदासगणूंचीं कीर्तनें होत. सुदाम, कबीरकांता, तुकाराम ( पहिला भाग ) हीं आख्यानें यावेळींच रचलीं गेलीं आहेत. न सरावलेल्या प्रतिभेंतून तीं स्फुरलीं असूनहि त्यांची रसवत्ता अमूप आहे. पण हें सांगण्याचें काम चरित्राच्या मर्यादेपलीकडील आहे. काव्यविवेचकानें हाताळावा असा हा विषय आहे. असो. अशा रीतीनें ज्या कीर्तनांनीं पुढें महाराष्ट्राला वेड लाविलें, सुशिक्षितांच्या नास्तिक विचाराला धक्के दिले, बुवांचें ढोंग चव्हाट्यावर आणलें, भक्तिरसाचे पावन प्रवाह वाहविले आणि चारपांच हजार श्रोत्यांना एकाच वेळीं आपल्या वयाचा आणि योग्यतेचा विसर पाडून हरिप्रेमाच्या आनंदांत देहभान विसरावयास लाविलें; त्या कीर्तनांचा पाया अशा रीतीनें घातला गेला.

श्रीदासगणूंच्या भोंवतीं त्यांच्या चाहत्यांचा परिवार या काळींहि फार मोठा असे. अडचणींत सांपडलेल्या अनेकांना अधार देऊन त्यांनीं जीवनांत स्थिर केलें आहे. श्री. सावळाराम झिक्रकीर, श्री. माधवराव आडकर, इत्यादि मित्र त्यांपैकींच होत. उदाहरणाकरितां म्हणून श्री. तुळशीराम दळवी यांचें नांव सांगण्यासारखें आहे. कॉलऱ्याच्या साथींत यांचे वडील वारले. हा १२–१३ वर्षांचा अल्पवयी पोरका मुलगाहि आजारी पडला. या अनाथ पोराला दासगणूंनींच स्वतः शुश्रुषा करून वाचविलें. संभाळून पुढें शिक्षण देऊन वाढविलें. जामखेडास हे गृहस्थ शाळामास्तर होते. दासगणूंचें काव्य लिहिण्याचें काम त्यावेळीं बहुधा श्री. तुळशीराम दळवी यांनींच केलें आहे.

"हें चरित्र कामधेनू । दोहन करी दासगणू ।
लेखक झाला सुलक्षणू । तुळशीराम छात्र माझा ॥ '

'भक्तिलीलामृत' ग्रंथांत याप्रमाणें त्यांचा उल्लेखहि आहे. त्या वेळच्या लावण्या छक्कडादि काव्यांत—

"गणू कवन करी ।
बसून पारावरी ।
अंबु झील घरी ।
रामा पांडूनं बहार केली ॥

## अनेकांस आश्रय दिला

असें ज्यांचे उल्लेख वरचेवर केले आहेत, तो अंबू गोंधळी आणि त्याचीं दोन मुलें रामा व पांडू यांचा संसार तर सर्वस्वीं दासगणूंच्या काव्यावरच चाललेला होता. श्री. रंगोबा लोहकरे, श्री. बापू डोंगरे, श्री. भाऊराव सवताडकर, श्री. बापू वाडकर अशा स्नेह्यांची संख्याहि बरीच होती. त्यावेळीं दासगणूंना स्वतःचा असा कोणताच व्याप नसल्यानें कचेरींतून सुटतांच ते या मंडळींत येऊन बसत आणि मुंज्याच्या पारावर डफ तुणतुण्याच्या झंकारांत ही बैठक मध्यरात्रींपर्यंत चाले. कारण कुटुंब सौ. सरस्वतीबाई ह्या थोड्या वेडसर असल्यानें श्रीदासगणूंना संसारसुख फारसें लाभलें नाहीं. 'कुटुंब वेडे सरस्वती' असा पत्नीचा उल्लेख त्यांनीं 'गोदामाहात्म्यां'त स्वतःच केला आहे. लावण्या, पोवाडे रचून त्या खड्या सुरानें म्हटलेल्या ऐकणें, हीच त्यांच्या आयुष्यांतील एकमात्र करमणूक होती. श्रीदासगणूंना स्वयंपाकहि पुष्कळदां स्वतः करावा लागे. अंबू गोंधळ्याची बायको चांगुणा ही त्यांचीं वरचीं कामें उरकी. त्या बाईनें धान्य निवडून नीट करून, दाणे असतील ते दळून यांचेकडे पोंचवावें आणि मग यांनीं ते शिजवून खावे, अशी पद्धत होती. श्री. सावळाराम झिक्रीकर वा श्री. माधवराव आडरकर यांच्यासारखें त्यांचे कांहीं स्नेही मधून मधून दीर्घकाळपर्यंत यांचेकडेच राहात. तेच त्यांना स्वयंपाक करून घालीत. एकंदरींत श्रीदासगणूंच्या जीवनांत खासगी असें कांहींच नव्हतें. सांसारिक पाश वा आप्तेष्टांचे संबंध तुटतच जावे, अशा चमत्कारिक घटना श्रीदासगणूंच्या आयुष्यांत सहजपणें घडून आल्या.

## एक संस्मरणीय प्रसंग

एकदां असें झालें कीं, श्रीदासगणूंचे चुलतबंधु (जनार्दनपंताचे चिरंजीव) श्री. बाबुराव यांच्या विवाहप्रसंगीं वधुपक्षाकडील भोजनसमारंभास वरपक्षाची मंडळी जमली होती. श्रीदासगणूंची स्थिति बेताची. ते एक जुना मळकट मुटका नेसून भोजनास गेले आणि साधारण लोकांच्या पंक्तींत जाऊन बसले. त्या वेळीं एकानें म्हटलें, "तुम्ही वर जा. व्याहीमंडळींची विशेष व्यवस्था माडीवर केली आहे." त्याप्रमाणें श्रीदागणू माडीवरील पंक्तीत आले. खाशा स्वाऱ्या अद्यापि आल्या नव्हत्या. नवरदेवाचे आणि त्याच्या बंधूचें अशीं पहिलीं दोन पानें सोडून तिसरें पान त्यांनीं धरलें. सख्ख्या चुलतभावाच्या मानाची जागा निश्चितपणें तीच होती.

तेथील व्यवस्थापकानें दासगणू कोण तें ओळखलें नाहीं. साधा जुनवट मुकटा पाहून हा कोणी तरी आगांतुक ब्राम्हण असला पाहिजे, असें तो समजला आणि रागानें म्हणाला, "ही व्याह्यांची पंगत आहे. भटाभिक्षुकांचीं पानें खालीं मांडलीं आहेत, आपली योग्यता काय, कुठें बसावें, हें सुद्धां कळण्याची अक्कल नाहीं! माणूसच आहांत ना! उठा. खालीं व्हा." इतकेंच म्हणून न थांबतां त्या उतावळ्या गृहस्थानें हात धरून त्यांना

# मला देव कसा भेटला ?

—स्वामी रामदास

**स्वा**मी रामदास ( १८८४ ते १९६३ ) हे गेल्या वर्षी समाधिस्त झाले हें आमच्या वाचकास माहीत आहे. ते तुमच्या आमच्या सारखे उद्योग व व्यवसाय करणारे एक सद्‌गृहस्थ होते. परंतु त्यांच्या जीवनांत असा एक क्षण आला कीं त्यांना देवाला भेटण्याची दारुण उत्कंठा वाढूं लागली. देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांच्या तुटी ' तसेंच त्यांच्या बाबतींत झालें. वेळ आली तेव्हां त्यांनीं घरदार, धंदा, रोजगार व नाती-गोतीं या सर्वांचा एकदम त्याग केला. आणि सत्याच्या शोधा-साठीं ते घराबाहेर पडले !

**रामनाम हें भांडवल**

ते घराबाहेर पडले ते कशासाठीं ? देवाच्या सख्यत्वासाठीं ! त्यांच्याजवळ त्यावेळीं कोणतें भांडवल होतें ? रामनाम ! रामनामाच्या सतत ध्यास व त्याचाच सतत जयघोष. सारा भारत देश त्यांनीं पायाखालीं घातला. बरोबर भांडवल राम-नामाचें. रामावर संपूर्ण श्रद्धा. तोच तारणारा व जीवनपथावरील वाटाड्या. तोच सर्वस्व व सर्वाधार. ही त्यांची दृढ श्रद्धा.

यात्रेंत व भ्रमंतींत त्यांचे अतोनात हाल झाले. कसोटीच्या प्रसंगांस तोंड द्यावे लागले. अपमानांची व हालांची पराकाष्ठा झाली. परंतु रामनामावरील त्यांची श्रद्धा अढळ होती. ती त्यांना जागवीत होती. हालचाल करवीत होती.

पुढें पुढें त्यांची ती श्रद्धा इतकी कांहीं बलवत्तर व बलशाली झाली कीं, त्यांना श्रीराम जिकडे तिकडे प्रत्येक वस्तुमात्रांत दिसूं लागला. त्यांचें जीवन अंतर्बाह्य राममय झालें. धन्य त्याचें जीवन कीं ज्याला सर्वत्र रामप्रभु दिसूं लागले !

---

खालीं ओढलें. श्रीदासगणूंचा स्वभाव अत्यंत मानी नी तापट. हा अपमान त्यांच्या जिव्हारीं लागला. ते तेथून गेले ते थेट पुंडलीकाच्या विठ्ठलमंदिरांत आले आणि देवाच्या पायांवर हात ठेवून सद्‌गदित स्वरांत म्हणाले, "विठोबा, आजपासून कोणाच्या लग्नमुंजीला जाईन तर तुझ्या पायांची शपथ."

मागाहून दासगणू हे जावयाचे बंधू असें कळल्यावर वधुपक्षांतील प्रमुख गृह-स्थांनीं व्याह्यांची नाना प्रकारें क्षमा मागितली. घरच्या मंडळींनींहि पुष्कळ समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ ! श्रीदासगणूंचा निश्चय ढळला नाहीं. ते शांत होऊन म्हणाले, "मला राग आला होता, पण आतां तो गेला आहे. त्या भरांत केलेली शपथ मात्र मला मोडतां येत नाहीं. माझ्या पांडुरंगाची ती शपथ आहे." ही शपथ श्रीदासगणू महाराज शेवटपर्यंत अत्यंत कसोशीनें पाळीत आले. त्यांच्या स्वतःच्या मुलींचेंहि लग्न दुसऱ्यांनींच लावलें.

---

त्यांना जें हवें होतें तें त्यांना त्यांच्या निस्सीम श्रद्धेनें दिलें होतें. देशपर्यटण करून ते परत आले ते प्रकाशमान् होऊन. त्यानीं दक्षिण कॅनरामधील कन्हनगड येथें आनंदाश्रमाची स्थापना केली. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति.' त्यांना आत्मानुभूति झालेली होती. त्यांचें जीवन राममय म्हणजेच आनंदमय झालें होतें. त्या आनंदाचा लाभ इतरेजनांस करून द्यावा असें त्यांना वाटल्यास त्यांत नवल नाहीं. सत्पुरुष का कधीं स्वार्थी असतो ? त्याला स्वार्थापेक्षां परमार्थ अधिक साधायचा असतो. त्यासाठींच तर त्यांचा पुनर्जन्म झालेला असतो. तुका म्हणे आतां । उरलों परोपकारापुरता.

**जगाच्या कल्याणासाठीं**

जे जे आपल्या सान्निद्ध येतील त्यांना त्यांच्या शाश्वत कल्याणाचा मार्ग दाखवायाचा, त्यांना काळोखांतून प्रकाशांत आणून सोडावयाचें व त्यांना त्यांच्या उद्धाराचा मार्ग दाखवायचा हेंच त्यानंतर त्यांचें जीवनकार्य होतें. 'व्हिजन' या नांवाची एक मासिक पत्रिका त्यांनीं सुरू केली व तिच्या द्वारें त्यांनीं आपला संदेश जगभर पसरविला.

आपणास देव भेटावा असें कां वाटलें व त्याची भेट कशी झाली याची माहिती त्यानीं आपल्या ग्रंथांच्याद्वारें करून दिली आहे.

ते म्हणतात, हें जीवन कशासाठीं ? सुखासाठीं माणसास सुख समाधान पाहिजे. तें सुख कसें मिळणार ? शाश्वत सुखाचा ठेवा कुठें आहे ? देवासान्निद्ध जाण्यांत देव आपल्याठायीं आहे, तो सर्वत्र व्यापलेला आहे अशी जाणीव होणें यांतच सुख सर्वस्व आहे.

मी सुखें भोगीत होतों. माझीं इंद्रियें त्यामुळें सुखावत होतीं; परंतु तें सुख शाश्वत नाहीं. तें चिरंतन काळ टिकणारें नाहीं. तें फसवें व पळणारें आहे याची एके दिवशीं मला जाणीव झाली. मला वाटूं लागलें कीं, हा मार्ग आपला नव्हे. त्याचा आपण त्याग केला पाहिजे व जें सुख शाश्वत आहे, त्याकडे आपण वळलें पाहिजे.

**सर्वत्र पुरुषोत्तम**

त्यासाठीं मी रामनामाची कांस धरली. तोच ध्यास सतत घेतला. त्यांतच तन्मय होऊं लागलों. आणि शेवटीं त्यांतच मला आनंद वाटूं लागला. रामनामामुळें माझें अंतःकरण पवित्र बनूं लागलें. अंतःकरण प्रकाशमय बनूं लागलें. सतत रामनामाच्या पठणानें माझ्या जीवनांत अलौकिक स्थित्यंतर घडून आलें. सारें जग मला राममय वाटूं लागलें. मी पूर्वीं माणसासारखा नव्हे जनावरासारखा वागत होतों. वावरत होतों. नंतर माझें रूपांतर माणसांत झालें. माझ्यांत माणुसकी आली. व तिच्या पाठोपाठ मला देवत्वाची प्राप्ति झाली. मला सारें जग पुरुषोत्तममय दिसूं लागलें.

जो जो कोणी त्या उद्योगाला लागेल, ज्याला ज्याला त्याला भेटण्याचा ध्यास लागेल, त्याला त्याची भेट झाल्याशिवाय रहाणार नाहीं, ही गोष्ट त्रिवार सत्य आहे, हे मी माझ्या अनुभवावरून सांगूं शकतों.

---




## मार्च १९६४

या महिन्यांत शिर्डीस श्रींचे दर्शनाकरितां बाहेरगांवची भक्तमंडळीं नेहमीप्रमाणें आली होती. कांहीं कलाकारानीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालील प्रमाणें—

**कितन**

श्री. ह. भ. प. रामराव गोविंदराव डूकरे मु. पेठ ता. चिखली जि. बुलढाणा. श्री. ह. भ. प. विश्वनाथ केशव छत्रे शास्त्री मु. कल्याण जि. ठाणें, श्री. ह. भ. प. गोपाळबुवा खोडेकर ६०३ बुधवार पुणें. संस्थान गवँई विठ्ठलराव मराठे. श्री. एकनाथशष्ठी फा. व. ११ गुढीपाडवा व आधिक चैत्र शु. ११ अशी चार कितँनें या महिन्यांत झालीं.

**गायन**

श्री. कुमार गंधर्व ( भानुकुल ) मु. देवास म. प्र. श्री प्रभाकरराव गोपाळराव खिचकवडे नागपूर.

**बँडवादन**

श्री. यादव विठ्ठल आव्हाड स्वागत ब्रास बँड उंदिरगांव मु. उंदिरगांव. ता. श्रीरामपूर.

**रथाची मिरवणूक**

रंगपंचमी व गुढीपाडवा या दिवशीं श्रींचे रथाची गांवांतून मिरवणूक दिवसा ६ ते ७ पर्यंत निघाली होती.

**मोठ्यांच्या भेटी**

मे. चॅरिटी कमिशनरसाहेब श्रींचेदर्शनास आले होते. मे. नामदार पी. के. सावंत (बाळासाहेब) मंत्री महाशय शेतकीखातें,महाराष्ट्रराज्य श्रींचे दर्शनास आले होते.

शिर्डीचे हवापाणी उत्तम असून रोगराई कांहीं नाहीं.

146

**Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

**श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७-०० |
| (२) ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३-७५ |
| (४) ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) Glimpes of Indian Spirituality | | by Pradhan | १-०० |
| (७) Glimpes of Indian Spirituality | (Telgu) | | १-०० |
| (८) श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस-दिल्ली | २-५० |
| (१०) साईबाबा-अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २-०० |
| (११) साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (१२) सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१४) श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१५) स्तवन-मंजरी | (मराठी) | श्री. दासगणू | ००-१३ |
| (१६) श्री साई-सुमनांजली | (मराठी १०८ नांवें) | | ००-०६ |
| (१७) कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१८) शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१९) श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (२०) Spiritual Symphony | | by R. S. Harshid Mehta | २-५० |
| (२१) Side lights on Sai Baba | (Eng.) | Calcutta | ००-७५ |
| (२२) Guide to Shirdi | (English) | | ००-१२ |
| (२३) स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००-२० |

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | |
|---|---|
| (1) Baba sitting on Stone 15" × 20" Thick | **1-00** |
| (2) ,, ,, ,, 9½" × 13½" medium | **00-37** |
| (3) ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | **00-50** |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra ( minimum purchase of Rs. 15 ). *Can be had from* (मागवा) :

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : श्री साईबाबा संस्थान, शिरडी, आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां
प्रकाशक : श्रीपाद बाळकृष्ण [illegible] मुंबई १४

146


**Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

**श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फें प्रकाशित**
**व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | **श्रीसाईसच्चरित्र** | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३-७५ |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality** | | by Pradhan | १-०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu) | | १-०० |
| (८) | **श्री साईलीलामृत** | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस-दिल्ली | २-५० |
| (१०) | **साईबाबा-अवतार व कार्य** | (मराठी) | श्री. धोंड | २-०० |
| (११) | **साईबाबांचे ४ अध्याय** | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (१२) | **सगुणोपासना** | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१४) | **श्री रुद्राध्याय ११ वा** | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१५) | **स्तवन-मंजरी** | (मराठी) | श्री. दासगणू | ००-१३ |
| (१६) | **श्री साई-सुमनांजली** | (मराठी १०८ नांवें) | | ००-०६ |
| (१७) | **कीर्तन पंचक** | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१८) | **शीलधी** | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१९) | **श्री साईगीतांजालि** | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (२०) | **Spiritual Symphony** | | by R. S. Harshid Mehta | २-५० |
| (२१) | **Side lights on Sai Baba** | (Eng.) | Calcutta | ००-७५ |
| (२२) | **Guide to Shirdi** | (English) | | ००-१२ |
| (२३) | **स्तवनमंजिरी व सुमनांजली** | (मराठी) | | ००-२० |

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 15" × 20" Thick | **1-00** |
| (2) | ,, ,, ,, 9½" × 13½" medium | **00-37** |
| (3) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | **00-50** |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.



मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां

प्रकाशक : श्रीपाद बाळकृष्ण दर्पे, मुंबई १४.



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते, त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५२४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई

टेलिफोन : ७५०४७


डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांचीं तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.


मुद्रक: श. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.

संपादक व प्रकाशक: श्रीपाद बाळकृष्ण दर्प, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड.